ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे
सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय
ऐनपूर
१९९३
सत्यमेव जयते

# सरदार

## नियतकालिक

२०२०-२१





(कोरोना महामारीमुळे ई-शिक्षणाकडे वाटचाल)

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## सरदार वल्लभभाई पटेल

### कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

# आमचे प्रेरणास्थान



## भारतरत्न लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

ता. रावेर, जि. जळगाव ४२५५०७ फोन – (०२५८४) २७१५४१

# सरदार

## वार्षिक नियतकालिक

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१**

**अंक २१ वा**

### संपादक मंडळ

प्रा.व्ही. एन. रामटेके
प्रा.एम. के. सोनवणे
प्रा.एच. एम. बाविस्कर
प्रा.डॉ. एस. एस. साळुंके
प्रा.डॉ. पी. आर. गवळी
प्रा.डॉ. जे. पी. नेहेते

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने

**मुद्रक**

प्रकाशन विभाग, स. व. प. कला
व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर

या नियतकालिकातील प्रकाशित झालेल्या साहित्यातील मते संबंधित लेखकांची आहे. संपादक मंडळ आणि संस्था या मताशी सहमत असतीलच असे नाही.

(खाजगी वितरणासाठी )

# ‘सरदार’ वार्षिक नियतकालिक

**अंक २१ वा**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१**

**संपादक मंडळ**

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. पी. आर. गवळी | प्रा. एच. एम. बाविस्कर |
| प्रा. एम. के. सोनवणे | प्रा. डॉ. जे. पी. नेहेते |
| प्रा. व्ही. एन. रामटेके | प्रा. डॉ. एस. एस. साळुंके |

**महाविद्यालय प्रकाशन क्र. ०४**

**प्रकाशक:**प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

**प्रकाशन स्थळ**: ऐनपूर ता. रावेर, जि. जळगाव, [महाराष्ट्र] पिन. ४२५५०७

**मुखपृष्ठ**:प्रा. हेमंत एम. बाविस्कर, डॉ. संदीप एस. साळुंके.

**अक्षरजुळणी व मुद्रण**: प्रकाशन विभाग, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

**मूल्य: विनामूल्य**

**© प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर**

**ईमेल:** **svpca123@yahoo.com**, **svpca.librarian@gmail.com**

**संकेतस्थळ:** **http://ainpurcollege.org/**

- **या नियतकालिकातप्रकाशित झालेल्या लेखातील मते हि ज्या त्या लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, संपादक सहमत असतीलच असे नाही.**
- **या कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर, इलेक्ट्रोनिक अथवा यांत्रिकी साधनांनी- फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.**

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# श्रद्धांजली



मागील शैक्षणिक वर्षात व आजपर्यंत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, कला, सहकार, आदी विविध क्षेत्रातील दिवंगत झालेल्या  थोर व्यक्ती, वीर जवान, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, साहित्यिक, कवी, गायक, उद्योजक, खेळाडू, कलाकार, कृषीतज्ञ, , शेतकरी व कार्यकर्ते, जगभरात नैसर्गिक आपत्ती आणि अपघात इत्यादींमुळे प्राणास मुकलेल्या मानव जातीस, आपल्या संस्थेचे सभासद, हितचिंतक, कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय अशा अनेक ज्या व्यक्ती दिवंगत झाल्या त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन त्यांना आदरपूर्वक, भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.



## भावपूर्ण श्रद्धांजली



# प्राचार्यांचे मनोगत

'सरदार' नियतकालिकाचे एकविसावे पुष्प आपल्यासमोर सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाने चालविलेल्या सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयाने २८व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. गेल्या २१ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'सरदार' हे नियतकालिक प्रकाशित करण्यात येते. या नियतकालिकामध्ये महाविद्यालयाने वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचे अहवाल, विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेले लेख, कथा, कविता, चुटकुले, ललित लेख, सुविचार वगैरे. विविध साहित्य प्रकाशित करण्यात येते. तेव्हापासून आजपर्यंत विद्यार्थी, प्राध्यापक आणि संस्थाचालक यांच्या सहकार्याने नियतकालिकाचे प्रकाशन नियमित सुरू आहे.

आपल्या सर्वांना माहीत आहे की, 'कोविड - १९' या विषाणूच्या प्रादुर्भावाने गेल्या एक ते दीड वर्षांपासून संपूर्ण मानवजातीवर दूरगामी परिणाम झालेले दिसून येत आहेत. भारतात २७ जानेवारी, २०२० रोजी 'कोविड-१९' या विषाणूने ग्रस्त झालेली महिला रुग्ण पहिल्यांदाच केरळ येथील 'थ्रीस्सूर' येथे आढळून आली आणि त्यानंतर या विषाणूने संपूर्ण देशात हातपाय पसरले.

केंद्र शासनाने २४ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित केल्याने महाविद्यालयात सुरु असलेल्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. दरम्यानच्या काळात पोलीस, डॉक्टर, नर्सेस, सरकारी अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, आशा वर्कर्स, समाजस्नेही संस्था, सरकारी मंत्रालय, सरकारचे आरोग्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, या योजनेचे स्वयंसेवक, शिक्षक इत्यादी विविध क्षेत्रातील लोकांनी जीवाची परवा न करता शासनाच्या आदेशानुसार या विषाणूविरुद्ध लढा पुकारला. संपूर्ण समाज जागृतीमुळे या विषाणूवर मात करण्यास जगभर काही प्रमाणात आले.

कोविड-१९' या विषाणूने मानवाला अनेक गोष्टी शिकविल्या. चार ते पाच हजार पाहुणेमंडळीत होणारी लग्न-समारंभ पन्नास लोकांच्या उपस्थितीत होऊ लागली. इतर सर्व सार्वजनिक कार्यक्रमांमधील गर्दीला लगाम लागला. शाळा-महाविद्यालयांमध्येही ऑनलाइन शिक्षण पद्धती सुरू झाली. डिजिटल व्यवहार होण्याचे प्रमाण वाढले. कार्यक्रमांमध्येही गर्दीवर नियंत्रण आले. सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमही पूर्वीप्रमाणे मोठ्या प्रमाणात होण्यावर बंधन आले. काही प्रमाणात शाळा, महाविद्यालय सुरू होऊ शकली नाहीत. महाविद्यालयातील विद्यार्थी प्रत्यक्ष येऊन शिक्षण घेऊ शकले नाहीत आणि म्हणूनच '२०२०-२०२१' या शैक्षणिक वर्षाच्या नियतकालिकामध्ये आम्ही विद्यार्थ्यांचे लेख, कथा, कविता, ललित लेख, सुविचार वगैरे.यांचा समावेश करु शकलो नाही पण ज्या पद्धतीने विविध ॲपच्यामाध्यमातूनऑनलाइन शिक्षण आणि ऑनलाइन परीक्षा घेण्याचे कार्य सुरू राहिले आहे, त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी ऑनलाइनच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविण्यात आले. त्या सर्व उपक्रमांच्या अहवालांचा समावेश या अंकात करण्यात आलेला आहे. संशोधनाची आवड असलेल्या संशोधकांकडून ऑनलाइन पद्धतीने शोधनिबंध मागविण्यात आले आणि ऑनलाइन पद्धतीने 'ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'एकविसाव्या शतकाकडे वाटचाल व कोरोनाचे महासंकट' ही दोन पुस्तके प्रकाशित करण्यात आली. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा असे विविध उपक्रम ऑनलाइन मोडमध्ये घेण्यात आले. आजीवन शिक्षण, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग इत्यादी विभागांमार्फत विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्रे, व्याख्याने, जयंत्या पुण्यतिथी इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

क्रीडा विभागामार्फत विविध खेळांचे वेबिना रांचे आयोजन करण्यात आले. योग दिवस, आरोग्य विषयाची कार्यशाळा, संशोधन लेख कसा लिहावा, शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन परिषद, व्याख्यान, बचत गटातील महिलांसाठी कार्यक्रम - चर्चासत्राच्या माध्यमातून संवाद, बौद्धिक मालमत्ता व अधिकार , पर्यावरण दिनानिमित्त - पर्यावरणावर चर्चासत्र, 'मशीन

लर्निंग' या नवीन संगणकीय भाषेवर कार्यशाळा, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवर वेबिनार, मानसशास्त्रीय, गणितीय, मराठी, अर्थशास्त्र, हिंदी, राज्यशास्त्र, रसायन शास्त्र, भूगोल इत्यादी विषयांची ऑनलाइन पद्धतीने स्पर्धा परीक्षेस पूरक - अशा परीक्षांचे आयोजन करण्यात आले. समान संधी केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, युवती सभा, विज्ञान मंडळ, प्राध्यापक प्रबोधिनी मंडळ - विविध विभागांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे (ऑनलाइन मोडने कार्यक्रमांचे )आयोजन केले.

अर्थशास्त्र विभागामार्फत 'गुंतवणूकीचे विविध पर्याय' या विषयावर कंझ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया ( एनजीओ ) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दोन ते तीन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. वर्षभर ऑनलाइन /ऑफलाइन मोडमध्ये घेण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांच्या अहवालांचा समावेश या अंकात करण्यात आलेला आहे. कोविड-१९ च्या विषाणूने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जरी येऊ दिले नाही, तरी ऑनलाइनचा पर्याय निवडून शिक्षण देणे - तसेच शिक्षणेतर कार्यक्रमांमध्ये कुठलाही खंड पडू दिला नाही.

आपल्या देशातील संशोधकांनी खूप मेहनत घेऊन 'कोविड-१९' या विषाणूवर लस शोधून काढली आणि टप्प्याटप्प्याने लसीकरण सुद्धा सुरू आहे. आज तरी मोठ्या प्रमाणात या विषयांवर आपण विजय मिळवल्याचे दिसून येत आहे पण गाफील राहून चालणार नाही.' कोविड-१९' ने जी शिकवण मानवजातीस दिली आहे, त्या अनुभवाचा धडा घेऊन आपण शासनाने घालून दिलेले बंधनांचे व नियमांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. कठीण परिस्थितीत ज्या कोविड योद्ध्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता ज्या सर्व सामान्य रुग्णांची काळजी घेतली, त्या सर्व कोविड योद्ध्यांप्रती आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे आणि एवढी काळजी घेऊनही ज्या डॉक्टर, नर्सेस, संशोधक, कलाकार, राजकारणी, समाजकारणी, शास्त्रज्ञ, शिक्षक, शेतकरी, सामान्य नागरिक यांनी आपले प्राण गमावले आहेत, त्या सर्व मृतात्म्यांना परमेश्वर चिरशांती देवो अशी प्रार्थना करून त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करूया.

ऑनलाइन मोडच्या माध्यमातून सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य उत्तम प्रकारे केलेले आहे आणि म्हणूनच महाविद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागलेला आहे.

संस्थाचालकांचे कुशल मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेहनती वृत्ती यामुळेच महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. महाविद्यालयाने राबविलेल्या वर्षभरातील विविध उपक्रमांचे प्रतिबिंब म्हणजेच 'सरदार' नियतकालिक होय. आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने याचा आपणास प्रत्यय येईलच. प्रामाणिकपणे काम करीत असताना काही त्रुटी निश्चित राहू शकतात. त्या त्रुटींचा स्वीकार करून भविष्यात त्या राहणार नाहीत, अशी ग्वाही प्राचार्य म्हणून मी देऊ इच्छितो. नियतकालिक प्रकाशित करण्याकरिता व्यवस्थापन मंडळाचे अनमोल असे मार्गदर्शन लाभलेले आहे त्यांचे मी आभार मानतो. संस्थेचे अध्यक्ष मा. भागवत भाऊ पाटील तसेच संस्थेचे चेअरमन मा. श्रीरामजी पाटील तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळाने केलेले मार्गदर्शन आणि सहकार्य अमूल्य असे आहे. 'सरदार' या नियतकालिकाचा अंक वाचकांच्या हाती देण्यायोग्य अचूक टंकलेखन करून डॉ. संदीप साळुंखे यांनी दिला. यास्तव आम्हाला हा अंक वाचकांच्या हाती देण्यास आनंद होत आहे.

धन्यवाद

**डॉ. जे. बी. अंजने**
**प्राचार्य.**

# संपादकीय

आमच्या महाविद्यालयाचे २०२०-२१ या वर्षाचे हुबेहूब आरसा म्हणजे आमचे सरदार नियतकालिक आपणासमोर समर्पित करतांना संपादक मंडळाला अत्यंत ब्रम्हानंद होत आहे.

आज आमच्या महाविद्यालयाच्या स्थापनेला २८ वर्ष झालेली आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने आणि मा. व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयात अनेकविध कार्यक्रमांचे ऑनलाइन आयोजन करण्यात आले. कारण कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सध्या महाविद्यालय ऑनलाइन सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व मानसिक कलागुणांना सतत वाव मिळावा म्हणून आम्ही विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानून - शासनाच्या नियमांचे पालन करून ऑनलाइन कार्यक्रम घेण्यात आले. आमचे महाविद्यालय तसे ग्रामीण भागात ज्ञानदानाचे कार्य करीत असले तरी आमचे सर्व प्राध्यापक वृंद इंटरनेटच्या माध्यमातून संपूर्ण जगाशी संबंध प्रस्थापित करून आहेत.

महाविद्यालयात कोविड-१९च्या काळातही विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग सतत कार्यरत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास होत असतो. महाविद्यालयातील विविध समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव असला तरी ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करून आमच्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आणि समाजव्यवस्थेचा कणा मानून व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, जयंत्या व पुण्यतिथ्या यासारखे उपक्रम राबविले. याचा लेखाजोखा म्हणजे 'सरदार' नियतकालिक होय.

शेवटी ज्ञानेश्वरांच्या पसायदानानुसार ' जो जे वांछिल, तो तें लाहो।' या उक्तीप्रमाणे आम्ही बोलतो! आणि थांबतो !

**संपादक मंडळ**

# सरदार

## नियतकालिक २०२०-२१

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | समिती प्रमुख | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ- पदाधिकारी व संचालक मंडळ | | १२-१३ |
| २ | महाविद्यालय विकास समिती | | १४-१५ |
| ३ | प्राध्यापक वृंद | | १६ |
| ४ | प्राध्यापकेतर वृंद | | १७ |
| ५ | महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी | | १८ |
| **अहवाल विभाग** | | | |
| **अ.क्र.** | **विवरण** | **समिती प्रमुख** | **पान क्र.** |
| ६ | संगणकशास्त्र विभाग | प्रा. एच. एम. बाविस्कर | २० |
| ७ | मतदान नाव नोंदणी अभियान | प्रा. एच. एम. बाविस्कर | २०-२१ |
| ८ | प्रवेश समिती | प्रा. हेमंत बाविस्कर | २२ |
| ९ | राष्ट्रीय सेवा योजना | डॉ. जे. पी. नेहेते | २२-२३ |
| १० | अर्थशास्त्र विभाग | डॉ. नीता एस. वाणी | २४ |
| ११ | हिंदी विभाग | डॉ. पी. आर. गवळी | २५-२६ |
| १२ | परीक्षा तक्रार निवारण समिती | डॉ. पी. आर. महाजन | २६ |
| १३ | ओ.बी.सी. (OBC) सेल | डॉ. पी. आर. महाजन | २७ |
| १४ | विद्यार्थी तक्रार निवारण समिती | डॉ. पी. आर. महाजन | २७ |
| १५ | मराठी साहित्य वाचन: राष्ट्रीय चाचणी | डॉ. रेखा पी. पाटील | २८ |
| १६ | युवती सभा | डॉ. रेखा पी. पाटील | २९-३१ |
| १७ | मराठी वाङ्मय मंडळ | डॉ. रेखा पी. पाटील | ३१-३२ |
| १८ | मराठी विभाग | डॉ. रेखा पी. पाटील | ३२-३३ |
| १९ | प्राध्यापक प्रबोधिनी मंडळ | प्रा. एस. बी. महाजन | ३४ |
| २० | AISHE (All India Survey on Higher Education) | प्रा. एस. बी. महाजन | ३४ |

| अ.क्र. | विवरण | समिती प्रमुख | पान क्र. |
|---|---|---|---|
| २१ | गणित विभाग | प्रा. एस. बी. महाजन | ३५ |
| २२ | रसायनशास्त्र मंडळ | डॉ. जे. पी. नेहेते | ३५-३६ |
| २३ | रसायनशास्त्र विभाग | डॉ. एस. एन. वैष्णव | ३६-३८ |
| २४ | "Research Methodology for P. G. Students" एक दिवशीय कार्यशाळा | डॉ. एस. एन. वैष्णव | ३८-३९ |
| २५ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र | डॉ. एस. एन. वैष्णव | ३९-४० |
| २६ | क्रीडा विभाग (जिमखाना विभाग) | डॉ. एस. एन. झोपे | ४०-४१ |
| २७ | विद्यार्थी विकास विभाग | प्रा. एस. पी. उमरीवाड | ४१-४६ |
| २८ | समान-संधी केंद्र | प्रा. एस. पी. उमरीवाड | ४७ |
| २९ | परीक्षा समिती | प्रा. एस. आर. इंगळे | ४८ |
| ३० | पारितोषिक वितरण समिती | प्रा. एस. आर. इंगळे | ४८ |
| ३१ | ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय) अहवाल | डॉ. एस. एस. साळुंके | ४९-५६ |
| ३२ | प्रकाशन विभाग | डॉ. एस. एस. साळुंके | ५७-५९ |
| ३३ | "बौद्धिक संपदा हक्क" राष्ट्रीय सेमिनार | डॉ. एस. एस. साळुंके | ५९-६० |
| ३४ | मानसशास्त्र विभाग | प्रा. व्ही. एन. रामटेके | ६०-६१ |
| ३५ | इतिहास विभाग | प्रा. अक्षय महाजन | ६१-६२ |
| ३६ | केळीतंत्रज्ञान व विस्तार केंद्र | डॉ. एस. ए. पाटील | ६२-६४ |
| ३७ | माजी विद्यार्थी समिती | डॉ. डी. बी. पाटील | ६४ |
| ३८ | बक्षीसासाठी शिक्षणप्रेमी देणगीदारांची नावे | श्री. गोपाल महाजन | ६५-६७ |
| ३९ | बक्षीस वितरण यादी २०२०-२१ | प्रा. एस. आर. इंगळे | ६८-६९ |
| ४० | पारितोषिक व शिष्यवृत्ती योजना | प्रा. एस. ए. पाटील | ७० |
| ४१ | विविध वर्तमानपत्रात महाविद्यालयाच्या कार्यक्रमाची मिळालेली प्रसिद्धी | -- | ७१-७३ |
| ४२ | महाविद्यालयाने २०२०-२१ मध्ये आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांची विस्तृत यादी | -- | ७४-७८ |

# - ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ -

## * पदाधिकारी व संचालक सदस्य *



श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)



श्री. श्रीराम नारायण पाटील
(चेअरमन)



श्री. संजय वामन पाटील
(सचिव)



श्री. हरी भिका पाटील
(संचालक)



श्री. सुदेश एकनाथ पाटील
(संचालक)



श्री. प्रविण गंभीर महाजन
(संचालक)



श्री. जगन्नाथ शामू पाटील
(संचालक)



श्री. रामदास नारायण महाजन
(संचालक)



श्री. प्रल्हाद मधुकर पाटील
(संचालक)



श्री. विकास दत्तात्रय महाजन
(संचालक)



श्री. नरेंद्र विठ्ठल पाटील
(संचालक)



श्री.डॉ. सतिष पाटील
(संचालक)



श्री. विजय जगन्नाथ पाटील
(संचालक)



श्री. पी.आर. चौधरी
(संचालक)



श्री. आर.एस. पाटील
(सह सचिव)



प्रा. डॉ. जे. बी. अंजने
(प्राचार्य)

# Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal's

## व्यस्थापन समिती २०१५-२०२०
## Management Committee 2015-2020

| Sr.No. | Name of Members | Designation |
|---|---|---|
| 1) | Shri.BhagawatVishwanath Patil | President |
| 2) | Shri.Shriram Narayan Patil | Chairman |
| 3) | Shri. Sanjay Waman Patil | Secretary |
| 4) | Shri. Hari Bhika Patil | Member |
| 5) | Shri.Sudesh Ekanath Patil | Member |
| 6) | Shri. Pravin Gambhir Mahajan | Member |
| 7) | Shri.Jagannath Samu Patil | Member |
| 8) | Shri.Ramdas Narayan Mahajan | Member |
| 9) | Shri.Pralhad Madhukar Patil | Member |
| 10) | Shri.Vikas Dattatray Mahajan | Member |
| 11) | Shri.Narendra Vitthal Patil | Member |
| 12) | Shri.Dr.Satish Bhagawat Patil | Member |
| 13) | Shri.Vijay Jagannath Patil | Member |
| 14) | Shri. Prakas Rajaram Chaudhary | Member |
| 15) | Shri. Ramdas Shivaram Patil | Asst. Secretary |

# * महाविद्यालय विकास समिती *



श्री. भागवत विश्वनाथ पाटील
(अध्यक्ष)



श्री. संजय वामन पाटील
(सदस्य)



श्री. पांडूरंग बाजीराव पाटील
(सदस्य)



कै.डॉ. गंभीर रामू पाटील
(सदस्य)
(मृत्यु दि. २६/०७/२०२०)



श्री. वासुदेव हरी पाटील
(सदस्य)



श्री. प्रविण गंभीर महाजन
(सदस्य)



प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने
(पदसिद्ध सचिव)



प्रा.डॉ. एस.एन. वैष्णव
IQAC (समन्वयक)
(रसायन शास्त्र विभाग प्रमुख)



प्रा. एन. यू. बारी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी



प्रा.डॉ. पी.आर. गवळी
(सदस्य)
शिक्षक प्रतिनिधी



डॉ. श्री. के. जी. कोल्हे
(सदस्य
(पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख)



प्रा.डॉ. नीता एस. वाणी
(सदस्य)
(महिला शिक्षक प्रतिनिधी)



श्री. नितीन पी. महाजन
(सदस्य)
शिक्षकेतर प्रतिनिधी

# विशेष अभिनंदन



प्रा.डॉ. एस. एस साळूंके
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठकडून पी.एच.डी. प्राप्त
विषय : "Impact of Cloud based Information Services in IIM Libraries in India: A study"

**Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal's**

# Sardar Vallabhabhai Patel Arts & Science College, Ainpur

## महाविद्यालय विकास समिती २०१७-२०२२

## College Development Committee 2017-2022

| Sr.No. | Name of Member | Designation |
|---|---|---|
| 1 | Shri.BhagawatVishwanath Patil | **President**, C.D.C. |
| 2 | Shri.Sanjay Waman Patil | **Secretary**, A.P.S.P.Mandals |
| 3 | Shri. Pravin Gambhir Mahajan | **Member**, A.P.S.P.Mandals |
| 4 | Shri Vasudeo Hari Patil | **Member** |
| 5 | Shri. Pandurang Bajirao Patil | **Member** |
| 6 | Principal,Dr.J.B.Anjane | **Member-Secretary**, C.D.C. |
| 7 | Prof.Dr. K.G.Kolhe | **Member**, C.D.C. (Teacher Representative) |
| 8 | Prof. Dr. P.R.Gawali | **Member**, C.D.C. (Teacher Representative) |
| 9 | Prof. Dr. S.N. Vaishnav | **Member**, C.D.C. (IQAC-Co-ordinator) |
| 10 | Prof. Dr. N.S.Wani | **Member**, C.D.C. (Lady Teacher Representative) |
| 11 | Shri. N.P.Mahajan | **Member**, C.D.C. (Non-teaching Representative) |

### Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal’s

# Sardar Vallabhabhai Patel Arts & Science College, Ainpur

## प्राध्यापक वृंद २०२०-२१
## Teaching Staff 2020-21

| Sr. No. | Name of Teacher | Designation | Subject |
|---|---|---|---|
| 1 | Prin. Dr. Jaswant Baburao Anjane | Principal | Physics |
| 2 | Dr. Rekha Promod Patil | Associate Prof. | Marathi |
| 3 | Prof. Dr. Kishor Govind Kolhe | Associate Prof. | Physics |
| 4 | Dr. Pravin. Ramkrishna Mahajan | Associate Prof. | Zoology |
| 5 | Dr. Sanjay Bagawat Patil | Assistant Prof. | Botany |
| 6 | Prof. Sachin Namdeo Zope | Dir.Phy.Edu. & Sports | Phy. Edu. |
| 7 | Dr. Ramesh Vitthal. Bhole | Associate Prof. | Geography |
| 8 | Prof. Mahendra. Kisan Sonawane | Assistant Prof. | Marathi |
| 9 | Prof. Sanjay Bhaskar Mahajan | Assistant Prof. | Mathematics |
| 10 | Dr. Satish Adhar Patil | Assistant Prof. | Botany |
| 11 | Dr. Neeta. Sudhakar Wani | Assistant Prof. | Economics |
| 12 | Prof. Sunil Ramesh Ingale | Assistant Prof. | Chemistry |
| 13 | Prof. Hement Magan Baviskar | Assistant Prof. | Physics |
| 14 | Prof. Nitin Uttamrao Bari | Assistant Prof. | English |
| 15 | Dr. Piru. Ranu Gawali | Assistant Prof. | Hindi |
| 16 | Prof. Sainnath Poshatte.Umriwad. | Assistant Prof. | Political Science |
| 17 | Dr.Satish Nathudas. Vaishanav | Assistant Prof. | Chemistry |
| 18 | Prof. Viond Namdeo. Ramteke | Assistant Prof. | Psychology |
| 19 | Dr. Dipak Bhagawan.Patil | Assistant Prof. | Chemistry |
| 20 | Dr. Jayant Pralhad Nehete | Assistant Prof. | Chemistry |
| 21 | Prof. Vikas Himattrao Patil | Assistant Prof. | Economics |
| 22 | Dr. Sandip Sadashiv Salunke | Librarian | Lib. & Info. Sci. |
| 23 | Prof Mohini kilash Bhangale | CHB | Computer Sci. |
| 24 | Prof. Rupali Chandrakant Barathe | CHB | Computer Sci. |
| 25 | Prof. Manisha Madhukar Mahajan | CHB | Computer Sci. |
| 26 | Prof. Vaishali Gopal Patil | CHB | Chemistry |
| 27 | Prof. Puja Madanlal Kumavat | CHB | Chemistry |
| 28 | Prof. Akshay Ravindra Mahajan | CHB | History |
| 29 | Prof. Dilip Sudhakar Sonawane | CHB | Marathi |
| 30 | Prof. Dnyaneshwar A. Koli | CHB | Economics |
| 31 | Prof. Renuka V. Gatekar | CHB | Chemistry |

**Ainur Parisar Shikshan Prasarak Mandal's**

# Sardar Vallabhabhai Patel Arts & Science College, Ainpur

## प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद २०२०-२१
## Non-Teaching Staff 2020-21

| Sr.No | Employee Name | Designation | Department |
|---|---|---|---|
| 1 | Shri. Gopal Sitaram Mahajan | Head Clerk | Office |
| 2 | Shri. Pravin Vaman Mahajan | Sr.Clerk | Office |
| 3 | Shri. Shriram Kashinath Choudhary | Jr. Clerk | Office |
| 4 | Shri. Pundalik Tukaram Patil | Lab. Assistant | Laboratory |
| 5 | Shri. Bhaskar Raghunath Patil | Peon | Office |
| 6 | Shri.Kutru Sitaram Awasarmal | Peon | Office |
| 7 | Shri.Nitin Pundalik mahajan | Lab. Attendant | Chemistry |
| 8 | Shri. Gopal Narayan Patil | Lab. Attendant | Physics |
| 9 | Shri. Genesh Jivaram Mahajan | Lab. Attendant | Zoology |
| 10 | Shri. Sahadeo Kishin Patil | Lab. Attendant | Botany |
| 11 | Shri. Mehendra Deovaram Mahajan | Peon | Office |
| 12 | Shri. Harshal Ramesh Patil | Lab. Attendant (Temporary) | Computer Science |
| 13 | Shri. Kadu Tukaram Bari | Mali (Temporary) | Office |

# महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी



कु. मनसुटे काजल सुनिल
तृतीय वर्ष विज्ञान (संगणकशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. महाजन स्वेता पांडुरंग
तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. पाटील योगीता तुकाराम
द्वितीय वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



कु.पाटील ऐश्वर्या संतोष
प्रथम वर्ष विज्ञान
प्रथम क्रमांक



कु. महाजन साक्षी चंपालाल
प्रथम वर्ष कला
प्रथम क्रमांक



कु. महाजन कांचन संजय
द्वितीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



कु. महाजन गायत्री प्रभाकर
द्वितीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. बारी निकिता बाळू
तृतीय वर्ष कला (मराठी)
प्रथम क्रमांक



कु. पाटील निकिता नितीन
तृतीय वर्ष कला (अर्थशास्त्र)
प्रथम क्रमांक



कु. सोनवणे लक्ष्मी राजू
तृतीय वर्ष कला (इतिहास)
प्रथम क्रमांक



कु. चौधरी निकिता प्रभाकर
एम.ए.(मराठी)
प्रथम क्रमांक



कु. चौधरी विद्या गणेश
उत्कृष्ट ग्रंथालय वाचक
प्रथम क्रमांक

# अहवाल
# विभाग

# संगणक शास्त्र विभाग

कोविड – १९ च्या महामारीत असलेल्या लॉकडाऊन मध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये नवीन तंत्रज्ञान विषयी माहिती असावी म्हणून सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर व क्राय सोलूशन, मुबई Cray solution, Mumbai यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ जून २०२० रोजी मशीन लर्निंग Machine Learning या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारचे उदघाटन वेबिनारचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे. बी. अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. या वेबिनारमध्ये मा. प्राचार्य यांनी नवीन तंत्रज्ञान हे सर्व माहित असावे तसेच नवीन तंत्रज्ञानचा वापर हा सर्वांना करता आला पाहिजे असे सांगितले. या वेबिनारचे सूत्रसंचालन संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापिका कु. रुपाली ब-हाटे यांनी केले. तसेच प्रमुख पाहुण्यचा परिचय संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापिका कु. मनीषा महाजन यांनी केले तसेच या वेबिनारमध्ये श्री हरीश चौधरी, क्राय सोलूशन, मुबई यांनी मशीन लर्निंग या विषयावर मार्गदर्शन केले. या वेबिनारचे आभार प्रदर्शन संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापिका कु. मोहिनी भंगाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख श्री हेमंत बाविस्कर संगणकशास्त्र विभागाचे समन्वयक प्रा. एस. बी महाजन यांनी प्रयत्न केले. या वेबिनारमध्ये एकूण २६० सहभागी होते.

प्रा.हेमंत बाविस्कर
संगणकशास्त्र विभागप्रमुख

# मतदार नाव नोंदणी अभियान

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथे मतदार नांव नोंदणी अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या हस्ते अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले. याकार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी लोकशाही व मतदार नांव नोंदणी अभियानाचे महत्व पटवून देण्यात आले व नंतर नविन मतदार नांव नोंदणी फार्मचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा, डॉ, के, जी, कोल्हे, डॉ, एस,ए, पाटील, प्रा, एस,बी, महाजन,

प्रा, डॉ, एस, एन, वैष्णव, डॉ, एस, बी, पाटील याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच महाविद्यालयात कार्यरत असलेल्या online teaching च्या विविध विषयांच्या WhatsApp Group वर मतदार नांद नोंदणीचे आव्हान करण्यात आले. Google forms च्या माध्यमातुन online survey करण्यात आला. महाविद्यालयाच्या विविध सुचना फलकावर मतदान नांव नोंदणी चे पोस्टर लावून अभियानाचे प्रचार व प्रसारचे काम करण्यात आले. तसेच महाविद्यालयामार्फत दि.१०/१२/२०२० रोजी online webinar zoom aap च्या सहाय्याने आयोजन करण्यात आले. यात मा. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने व प्राध्यापक हेमंत बाविस्करं यांनी मतदार नांव नोंदणीचे आव्हान केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. उमरीवाड यांनी केले.

दि, २५ जानेवारी २०२१ हा दिवस मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात आला, यादिवशी ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आले होते व त्यात प्रा, एस, पी, उमरीवाड यांनी सर्व उपस्थितांना शपथ दिली, तसेच मतदार दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयामार्फत ऑनलाईन गुगलफॉर्मच्या माध्यमातुन प्रश्नमजुंषा हा कार्यक्रम घेण्यात आला त्यात ९५ स्पर्धकांनी भाग घेतला तसेच निबंध **स्पर्धेचे आयोजन**सुध्दा करण्यात आले त्यात प्रथम क्रमांक कु,जागृती दरबारसिंग पाटील शिरपूर महाविद्यालय व कु, नेहा विजय रायपूरे सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर यांना मिळाल तर व्दितीय क्रमांक कु, पल्लवी राजेंद्रसिंग राजपूत आयएमआरडी महाविद्यालय शिरपूर तर तृतीय क्रमांक कु, पायल अनिल गोधवाणी आयएमआरडी महाविद्यालय शिरपूर व करिष्मा लोटन माळी आयएमआरडी महाविद्यालय शिरपूर यांनी पटकावला, तर सदर निबंध स्पर्धेसाठी 'परिक्षक म्हणून मराठी विभागचे प्राध्यापक डॉ, रेखा पाटील व प्रा, एम,के, सोनवणे यांनी पाहिले, महाविद्यालयाच्या या सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ, जे,बी, अंजने यांचे मोलाचे सहकार्य लाभले,

प्रा, एस,पी, उमरीवाड
समन्वयक, विद्यार्थी कल्याण विभाग

प्रा, हेमंत बाविस्कर
नोडल अधिकार, मतदार जनजागृती

# प्रवेश समिती अहवाल

सन २०२०-२१ हे वर्ष कोविड-१९ च्या प्रादुर्भाव असल्याने या वर्षाच्या सर्व प्रवेश प्रक्रिया हया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आल्यात, यात प्रवेश प्रक्रिया सोपी व सुलभ व्हावी म्हणून महाविद्यलायामार्फत विविध वेबिनारचे आयोजन करण्यात आलेत यात प्रामुख्याने दि, ३ जुलै २०२० रोजी महाविद्यालयाने digital edu IT solution Pune यांच्या सयुक्त विद्यामाने Digital transformation: eclassroom and learning management system या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते या वेबिनारसाठी यशस्वीसाठी वेबिनारचे कव्हीनर म्हणून डॉ, के,जी कोल्हे तर डॉ, एस, ए पाटील व हेमंत बाविस्कर यांनी सदरस्य म्हणून काम पाहिले, तसेच ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सहज व सुलभ व्हावा यासाठी महाविद्यालयाने Admission from home: e admission यावेबिनारचे आयोजन करण्यात आले होते, या वेबिनारसाठी कव्हीनर म्हणून हेमंत बाविस्कर व प्रवेश समिती सदस्य प्रा, एस,बी, महाजन, डॉ, आर, व्ही, भोळे डॉ, जे,पी नेहेते, प्रा, व्ही, एच, पाटील, व प्रा, व्ही, एन, रामटेके यांनी काम पाहिले, संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने सुरळीत पार पाडली, या प्रवेश प्रक्रियासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ, जे,बी, अंजने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

प्रा.हेमंत बाविस्कर
चेअरमन- प्रवेश समिती

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांनी राष्ट्र उभारणीत आणि राष्ट्र विकासात निरपेक्ष वृत्तीने सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची नियमित कार्यक्रमासाठी १४० एवढी स्वयंसेवकसंख्या होती.

महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या परीपत्राकान्वये नेमून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रासेयो एकक राबवते. कोविड-१९ च्या

प्रार्दुभावामुळे सर्व कार्यक्रम हे ऑनलाईन पध्दतीने साजरे करण्यात आले. नियमित कार्यक्रमांमध्ये जागतिक योग दिवस, आंतर राष्ट्रीय लोकसंख्या दिवस, आंतर राष्ट्रीय साक्षरता दिवस, सद्भावना दिवस, स्वंतत्रता दिवस, प्रजासत्ताक दिवस, आंतर राष्ट्रीय शांतता दिवस, रासेयो स्थापना दिवस, वाचन प्रेरणा दिवस, राष्ट्रीय युवक दिवस, विद्यार्थी दिवस, शहीद दिन, राष्ट्रीय रक्तदान दिवस, अहिंसा दिवस, एकता दिवस, संविधान दिवस, जागतिक महिला दिवस, राष्ट्र पुरुषांची जयंती व पुण्यतिथी,वसुंधरा अभियाना अंतर्गत हरित शपथअसे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.वन महोत्सवच्या निमित्ताने ०१/०७/२०१९ पासून ०७/०७/२०१९ या कालावधीत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचा “स्थापना दिवस”दिनांक २४ सप्टेंबर २०२०रोजीऑनलाईन पध्दतीने झूम ॲपच्या सहाय्याने साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमालारासेयोचे विभागीय समन्वयक डॉ. जी. आर. ढेंबरे सर आणिडॉ. पी.आर. महाजन सर यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त दिनांक ०२ऑक्टोंबर २०२०रोजी“आजच्या काळात गांधीजींच्या विचारांचे महत्व” या विषयावर वेबिणारचे आयोजन करण्यात आले होते.ध्वनी प्रदूषण व पर्यावरण जनजागृती निमित्ताने दि. १३नोव्हेंबर २०२१ रोजी“फटाके मुक्त दिवाळी” या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच जागतिक महिला दिवसयानिमित्ताने दि. ८ मार्च २०२१ रोजी “बचत गट: महिला सशक्तीकरणाचे एक साधन” या विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक वस्ती बलवाडी ता. रावेर येथील जि. प. मराठी शाळेत कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे होऊ शकले नाही.राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन मा.प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, जिल्हा व विभागीय समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. जयंत नेहेते, सहाय्यक कार्यक्रमअधिकारी डॉ. दिपक पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रेखा पाटील आणि स्वयंसेवक यांनी केले.या शैक्षणिक वर्षातील सर्व कार्यक्रमांसाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, चेअरमन, सचिव आणि संचालक यांचे मार्गदर्शन आणि उपस्थिती लाभली.

डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते
कार्यक्रम अधिकारी

डॉ. जे. बी. अंजने
प्राचार्य

# अर्थशास्त्र विभाग अहवाल

ऐ. प. शि . प्रसारक मंडळ संचलित स.व.प.कला व विज्ञान महाविद्यालयात सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राचे ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून अर्थशास्त्र विषय विशेष स्तरावर ठेवण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एम.ए. अर्थशास्त्र महाविद्यालयात सुरु करण्यात आले आहे. अर्थशास्त्र विभागात विभागप्रमुख प्रा.डॉ. नीता एस.वाणी असून प्रा-व्ही एच पाटील, प्रा. ज्ञानेश्वर कोळी कार्यरत आहे.

शैक्षणिक वर्ष 2020 - 21 हे वर्ष संपूर्णपणे ऑनलाईन शिकविण्यात गेले. शिकविण्याबरोबरच अर्थशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने घेतले त्याची झलक पुढील प्रमाणे

1. कोरोनाला हरवू या - गीत you tub वर प्रकाशित दि.19 एप्रिल 2020
2. Quize competition –राज्यस्तरीय दिनांक

   1) 25 मार्च 2020, 2) 15 एप्रिल 2020, 3) 16 एप्रिल 2020, 4) 19 एप्रिल 2020, 5) 4 मे 2020

3) ई बुक प्रकाशन - दि.7 डिसेम्बर 2020

4) चर्चासत्र - बँकांचे खाजगीकरण एक चिंतन दि.24 मार्च 2021

5) दोन दिवसीय वेबिनार - कंझूमर सोसायटी ऑफ इंडिया मुंबई आणि स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने उपभोक्तावाद आणि वित्तीय साक्षरता या विषयावर दि.29 एप्रिल आणि 30 एप्रिल 2021 रोजी संपन्न.

**शैक्षणिक वर्ष 2020-21 चा अर्थशास्त्र विभागाचा निकाल पुढीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| एस. वाय. बि. ए. | प्रथम क्रमांक - महाजन दिपक समाधान -83.89 %<br>द्वितीय क्रमांक - तायडे रितिक रमेश - 81.96<br>तृतीय क्रमांक - मोरे धनश्री जगज्जीवन -81.64 % |
| टी. वाय. बि. ए. | प्रथम क्रमांक -महाजन गायत्री प्रभाकर -89.53 %<br>द्वितीय क्रमांक -महाजन नेहा राजेंद्र -88.14%<br>तृतीय क्रमांक - भंगाळे मिनल कमलाकर -86.75 % |
| एम. ए. | प्रथम क्रमांक -तायडे दिक्षा राजेंद्र -CGPA -9.56<br>द्वितीय क्रमांक -राजपूत शांताराम गोकुळसिंग - CGPA-9.44<br>तृतीय क्रमांक (विभागून )-पाटील अश्विनी भास्कर -CGPA -9.38<br>महाजन रुचिता विकास -CGPA-9.38 |

प्रा. डॉ. नीता एस. वाणी

विभाग प्रमुख

# हिंदी विभाग

## प्रश्न मंजुषा स्पर्धा

आज संपूर्ण जगात कोरोनाचा संसर्गजन्य रोगाने थैमान घातले आहे. या रोगाचा फैलाव रोखण्यासाठी प्रशासनाकडून दिनांक 17 मे 2020 पर्यंत ताळेबंदी जाहीर केली आहे. या दरम्यानच्या काळात महाविद्यालयाचे कामकाज वर्क फ्रॉम होम पद्धतीने चालू राहणार आहे.

सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय, ऐनपूर हिंदी विभागाकडून हिंदी भाषेचे ज्ञान वाढवण्याच्या उद्देशाने “ऑनलाइन राष्ट्रीय प्रश्नमंजुषा” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचे हिंदी विषयाचे सामान्यज्ञान वाढवणे. ही परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धा परीक्षेत एकूण 40 गुणांपेक्षा जास्त गुणप्राप्त विद्यार्थ्यांना ई-प्रमाणपत्र देण्यात आले. या परीक्षेचे व्यवस्थापन महाविद्यालयाचे ग्रंथालय विभागाचे प्रा. एस. एस. साळुंखे यांनी पाहिले व समन्वयक प्रा.डॉ. पी. आर. गवळी होते. तसेच या स्पर्धासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## ज्ञानगंगोत्री हस्तलिखित

महाविद्यालयीन आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालयातील सर्व मंडळे व विविध समित्यांमार्फत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सदर ज्ञानगंगोत्री हस्तलिखित मंडळ करीत असते. विद्यार्थ्यांचे सुक्ष्म लेखन कौशल्याला पुढे आणून लिखाणासाठी एक हक्काचे मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधील विविध विषयावरील लेख अथवा कविता आणून समितीतील प्राध्यापकांकडून तपासून घेतात, त्यावर योग्य मार्गदर्शन करून सुधारणा झाल्या नंतर ते साहित्य भित्ती फलकावर लावण्यात येते.तसेच महाविद्यालयाच्या हिंदी विभागामार्फत विविध कार्यक्रम घेतले जातात.शैक्षणिक वर्ष 2019-20 या कोरोना काळामध्ये सरदार वल्लभंभाई पटेल महाविद्यालय, ऐनपूर हिंदी विभागाकडून हिंदी भाषेचे ज्ञान वाढवण्याच्या उद्देशाने “ऑनलाइन

राष्ट्रीय प्रश्नमंजुषा" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचे हिंदी विषयाचे सामान्यज्ञान वाढवणे. ही परीक्षेचेआयोजनऑनलाईन पद्धतीनेदि. 16/05/2021 रोजी करण्यात आले होते.या स्पर्धेत 785 स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धा परीक्षेत एकूण 40 गुणांपेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यार्थ्यांना ई-प्रमाणपत्र देण्यात आले. या परीक्षेचे व्यवस्थापन महाविद्यालयाचे ग्रंथालय विभागाचे प्रा.एस. एस. साळुंखे यांनी पाहिले व समन्वयक प्रा.डॉ. पी. आर. गवळी होते. तसेच या स्पर्धासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

डॉ.पिरु गवळी, हिंदीविभाग

# परीक्षा तक्रार निवारण समिती

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये परीक्षा तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. प्रवेशित सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना महाविद्यालयातील अंतर्गत परीक्षा आणि विद्यापीठाच्या परीक्षान संदर्भात माहिती द्यावी अस पहिल्या सभेमध्ये ठरवण्यात आले त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना परीक्षान सादरसंदर्भात सर्व नियम समजावून देण्यात आले आणि जर काही तक्रार असेल तर ती लेखी स्वरूपात समितीकडे सादर करण्यात यावी त्यावर समिती ने घेतलेला निर्णय हा अंतिम राहील असे सांगण्यात आले नियमांचा भंग केला गेला तर त्याकरिता असलेल्या शिक्षेची तरतुद याविषयीं माहिती देण्यात आली याप्रसंगी कोणीही नियमांचे उल्लंघन करू नये आणि अभ्यासपूर्वक परीक्षा देऊन यश संपादित करावे असे मा. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी सांगितले. समिती सदस्यांची सभा वर्षातून दोनदा आयोजित करण्यात आली. यावर्षी पण कोणत्याच विद्यार्थ्यांची तक्रार प्राप्त झाली नाही. अगदी विनातक्रार हे वर्ष पार पडले. त्याबद्धल प्राचार्य व समिती सदस्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

प्रा. डॉ. पी. आर.महाजन

समन्वयक, परीक्षा तक्रार निवारण समिती

# ओ.बी.सी सेल अहवाल

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये ओ. बी. सी सेल ची स्थापना करण्यात आली. प्रवेशित सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना महाविद्यालय आणि विद्यापीठाकडून तसेच महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या स्कॉलरशिप बद्दल माहिती करून द्यावी जसे राजर्षी शाहू महाराज स्कॉलरशिप, आर्थिक दुर्बल घटक यांना मिळणारी स्कॉलरशिप इ. ची माहिती व नियम समजावून सांगावे असे समितीच्या पहिल्या सभेमध्ये ठरवण्यात आले त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना सर्व नियम समजावून देण्यात आले. असे मा. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी सांगितले. समिती सदस्यांची सभा वर्षातून दोनदा आयोजित करण्यात आली.जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप चा लाभ घ्यावा असे आवाहन समिती तर्फे करण्यात आले.

प्रा. डॉ. पी. आर.महाजन

समन्वयक, ओ. बी. सी. सेल

# विद्यार्थी तक्रार निवारण समिती अहवाल

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये विद्यार्थी तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. प्रवेशित सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना महाविद्यालय आणि विद्यापीठाचे नियम समजावून सांगावे असे समितीच्या पहिल्या सभेमध्ये ठरवण्यात आले त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना सर्व नियम समजावून देण्यात आले आणि जर नियमांचा भंग केला गेला तर त्याकरिता असलेल्या शिक्षेची तरतुद याविषयीं माहिती देण्यात आली याप्रसंगी कोणीही नियमांचे उल्लंघन करू नये असे मा. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी सांगितले. समिती सदस्यांची सभा वर्षातून दोनदा आयोजित करण्यात आली. यावर्षी पण कोणत्याच विद्यार्थ्यांची तक्रार प्राप्त झाली नाही. अगदी विनातक्रार हे वर्ष पार पडले. त्याबद्धल प्राचार्य व समिती सदस्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

प्रा. डॉ. पी. आर.महाजन

समन्वयक, विद्यार्थी तक्रार निवारण समिती

# 'मराठी साहित्य वाचन: राष्ट्रीय चाचणी'

इ. स. 2020 च्या मार्च महिन्यातील 19 तारखेपासून कोरोना या संसर्गजन्य आजाराने बाधित व्यक्तींची संख्या वाढत गेल्याने ताळेबंदी लावण्यात आली. नियमित सुरू असलेले महाविद्यालयीन शिक्षण तात्पुरते बंद करण्यात आले. वार्षिक विद्यपीठस्तरीय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. कोरोना या संसर्गजन्य आजाराने बाधित व्यक्तींची संख्या जोपर्यंत आटोक्यात येत नाही, तोपर्यंत ताळेबंदीचा कालावधी वाढत गेला. दरम्यानच्या काळात विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याची सवय कायमस्वरूपी टिकून रहावी या दृष्टिकोनातून महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. जसे- विविध विषयांवर आधारित प्रश्नमंजुषा, चाचणी परीक्षा, निबंध-स्पर्धा वगैरे. घरात बंदिस्त असलेल्या विद्यार्थ्यांना - त्यांच्या बुध्दीला चालना देणारे उपक्रम राबविण्यात आले.

महाविद्यालयातील प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील, मराठी विभागप्रमुख यांनी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रा. महेंद्र सोनवणे यांच्या सहकार्याने 'मराठी साहित्य' हा विषय केंद्रस्थानी घेऊन 'राष्ट्रीय चाचणीचे आयोजन केले.

या चाचणीपरिक्षेत बहुपर्यायी - एकूण 30 प्रश्न विचारण्यात आले. प्रत्येक प्रश्नाला ( बरोबर उत्तर दिल्यास ) दोन गुण - असे एकूण 60 गुणांची परिक्षा आभासी पद्धतीने घेण्यात आली. ज्यांना 50 पेक्षा जास्त गुण संपादन केले, त्यांना आभासी प्रमाणपत्र देण्यात आले.

'मराठी साहित्य वाचन : राष्ट्रीय चाचणी' दि.14 मे पासून घेण्यात आली. 6 जून 2020 पर्यंत एकूण 141 सहभागिनीं या स्पर्धा चाचणीत सहभाग नोंदविला. या सहभागिंमध्ये काही प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षक आणि इतर व्यक्तींचा सहभाग होता. परीक्षेचे नियोजन करण्यासाठी तांत्रिक साहाय्य प्रा. एस.बी. महाजन यांचे सहकार्यलाभले.

प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील,
मराठी विभागप्रमुख

# युवती-सभा

महाविद्यालयातील युवतींमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांचा विकास व्हावा, सामूहिक आणि वैयक्तिक जीवनामध्ये त्यांच्यातील नेतृत्वगुणाचा विकास व्हावा, या उद्देशाने विद्यापीठ परिपत्रकानुसार २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी युवतीसभेची स्थापना करण्यात आली. युवतीसभेमुळे युवतींना येणाऱ्या समस्या त्यांना स्वतंत्र व्यासपीठावर मांडता येतात. या विचारमंचाच्या आधारे युवतीसभेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात.युवतीसभेची स्थापना व उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या शुभहस्ते दि. ११/०८/२०२० रोजी करण्यात आले.

दि. ०३/१२/२०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी निरक्षर असलेल्या बहिणाबाईंनी जीवनविषयक तत्वज्ञान आपल्या ओव्यांमधून सांगितलेले आहे. कृषिजीवन हे निसर्गाच्या रूपावर अवलंबून असते, अलिकडच्या काळात माणसापेक्षा कागद शहाणा आहे, असे आपल्या व्याख्यानातून महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. डॉ. के. जी. कोल्हे यांनी सांगितले. अध्यक्ष स्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी बहिणाबाईंनी केलेले सूक्ष्म निरीक्षण 'खोप्यामधी खोपा' यासारख्या कवितेतून दिसून येत असल्याचे नमूद केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी बहिणाबाई यांचे आयुष्य हे नेहमीच युवतींना प्रेरणा देणारे असेच आहे. या कार्यक्रमाचे आयोजन युवतीसभेतर्फे करण्यात आले.

दि. ०८/०३/२०२१ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'बचत गट : महिला सशक्तीकरणाचे एक साधन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे होते. कार्यशाळेचे उदघाटन शेंदूर्णी येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील ह्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेला प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून शेंदूर्णी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रा. डॉ. योगिता चौधरी, बा. ना. पाटील माध्यमिक विद्यालय, बलवाडी येथील दिलीप वैद्य व ऐनपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. अल्काताई चौधरी ह्या लाभल्या.

प्रा. डॉ. योगिता चौधरी यांनी बचत गटाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. अलीकडे महिला बचतगटात सहभागी होऊ लागल्या आहेत, बऱ्यापैकी सक्षम होऊ लागल्या आहेत, पण अजूनही हे प्रमाण वाढण्याची गरज आहे, असे दिलीप वैद्य यांनी सांगितले. सौ. अल्काताई चौधरी ह्या स्वतः बचत गट चालवत असल्याने त्यांनी कार्यशाळेत त्यांचे स्वतःचे अनुभव सांगितले. प्राचार्य डॉ.जे. बी. अंजने यांनी अध्यक्षीय समारोपात 'कोरोनाच्या काळात आशा वर्कर्स, महिला पोलीस आणि दवाखान्यातील आरोग्यसेविकांच्या रूपाने महिला नेतृत्व करीत असताना दिसून आल्या.' या कार्यशाळेचा लाभ एकूण २०८ महिलांनी घेतला.

१०/०३/२०२१ रोजी सावित्रीबाई फुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. ज्योतिराव फुले यांच्या सहकार्याने त्यांनी शैक्षणिक, सामाजिक उन्नयन केले. शेकडों वर्षांपासून ज्ञानाच्या अंधारात जीवन जगणाऱ्या महिलांना ज्ञानाचा प्रकाश दाखवण्याचे महत्वपूर्ण कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कुंभार अश्विनी बाळू हिने केले, तर आभार कु. नेहा विजय रायपूरे हिने मानले.

दि. ३०/०३/२०२१ रोजी 'युवतींचा आहार, आरोग्य आणि सौंदर्य' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा एम.ओ. यू. अंतर्गत घेण्यात आली. स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर - युवती सभा आणि भुसावळ येथील श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटक हिंदी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुधीरकुमार नवनीत शर्मा हे होते, तर अध्यक्षपद ऐनपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले.

या ऑनलाइन कार्यशाळेतील पहिले विचारपुष्प डॉ. नेहा चौधरी यांनी गुंफले. 'युवतींचा आहार' या विषयावर बोलतांना त्यांनी आहार कसा असावा? कोणता आहार घ्यावा ? किती आहार घ्यावा ? विरुद्ध अन्न कोणते ? त्याचे शरीरावर कोणते आणि कसे परिणाम होतात ? अशा प्रकारची दैनंदिन जीवनात उपयोगी असणारी माहिती नेहा मॅडम यांनी आपल्या व्याख्यानातून दिली.

सावदा येथील डॉ. अविनाश बऱ्हाटे यांनी 'युवतींचे आरोग्य' या विषयावर दुसरे विचारपुष्प गुंफले. वाढत्या वयाबरोबर होणारे शारीरिक बदल, मासिक पाळी - त्या संबंधित असलेल्या समस्या व मेनोपॉज, वयानुसार बदलत जाणारे हार्मोन्स अशा विविध आरोग्य विषयांवर विस्तृत माहिती दिली. तारूण्यावस्थेत प्रत्येक मुलीला सुंदर दिसायला खूप आवडत असते. त्यासाठी त्वचेची आणि केसांची काळजी घेणे आवश्यक असते. ही घेत असतांना व्यायामाची पण मदत होत असते. असे चित्रफितीच्या माध्यमातून सौंदर्यतज्ञ सौ. सरिता मॅडम यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. कार्यशाळा संपविण्याच्या आधी श्रोत्यांना पडलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ४९३ युवती सहभागी झाल्या. ही कार्यशाळा ऑनलाइन असल्याने तांत्रिक साहाय्य सह-समन्वयक प्रा. संदीप साळुंके आणि समन्वयक प्रा. विवेक जोशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. नीता वाणी, पाहुण्यांचा परिचय प्रा. ज्योती ओस्तवाल, पाहुण्यांचे आभार प्रा. पूनम त्रिवेदी यांनी मानले.

प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील

# मराठी वाड्मय मंडळ

शैक्षणिक वर्ष 2020-2021 या दरम्यान सर्व उपक्रम हे ऑनलाईन झालेले आहेत. कोरोना सारख्या संसर्गजन्य आजाराने समाजाला ग्रासलेले असल्याने महाविद्यालयीन परिसरात कार्यक्रम घेणे शक्य झाले नाही.

दि. ११ ऑगस्ट २०२० रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार वर्धापन दिनानिमित्त मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. तसेच 'बहिणाबाईंचे जीवन व साहित्यिक कार्य' या विषयावर विद्यार्थ्यांना झूम अँपच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.सदर कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज. बा. अंजने हे अध्यक्ष स्थानी होते. बहिणाबाई ह्या निरक्षर असल्या तरी त्यांनी जीवनाच्या शाळेतून अनुभव रुपी शिक्षण मिळवलेले होते. त्यांच्या

काव्यातून ज्या अनुभवांची अभिव्यक्ती त्यांनी केलेली आहे, ती आजही उपकारक आहे, असे वक्तव्य अध्यक्षीय भाषणातून प्राचार्यांनी मांडले.

१५ ऑक्टोबर,२०२० रोजी ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून 'वाचनाचे महत्व' विद्यार्थ्यांना सांगितले. ऑनलाईन तासिकेमध्येच 'वाचन-प्रेरणा दिवस' साजरा केला.

जानेवारी महिन्यात मराठी भाषा पंधरवाडानिमित्त साधून 'ग्रंथ-दिंडी' काढण्यात आली. त्याचप्रमाणे शिरपूर येथील कला व विज्ञान महाविद्यालय, येथील डॉ. प्रिया कुरकुरे यांचे ' मराठी भाषा : संवाद कौशल्ये' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या व्याख्यानाचा लाभ परिसरातील विद्यार्थी, विद्यापीठातील प्राध्यापक व सर्वसामान्य जनतेने घेतला.

दि. २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती मराठी विभागातर्फे साजरी करण्यात आली. प्रा. डॉ. वासुदेव वले यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषा ही स्थितीतील नसून गतिशील आहे. मराठी भाषेत नवनवीन प्रयोग दृष्टीस पडत असतात. वैश्विक साहित्य निर्मिती करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एम. के. सोनवणे यांनी, सूत्रसंचालन प्रा. दिलीप सोनवणे यांनी तर आभार मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील यांनी व्यक्त केले.

प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील

# मराठी विभाग

ऐनपूर परिसरातील कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरुवातीपासून मराठी भाषेची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयात मराठी हा विषय सुरू करण्यात आला. १९९४-१९९५ या शैक्षणिक वर्षापासून हा विषय विशेष स्तरावर शिकविला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाढत असलेली अभिरुची लक्षात घेऊन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर स्तरावर विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यात आला. सदर विभागात खालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील - विभाग प्रमुख

२) प्रा. एम. के. सोनवणे - समन्वयक, पदव्युत्तर विभाग

३) प्रा. दिलीप सोनवणे

दरवर्षी मराठी विशेष स्तर घेतलेल्या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक जीवनाची होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. परंतु शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये ऑनलाइन शिक्षण पद्धती असल्याने आणि कोरोनाचा प्रादुर्भाव परिसरात जाणवत असल्याने सहलीचे आयोजन करता आले नाही. या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली आहे, त्यांचा निकाल उत्कृष्ट लागलेला आहे. या वर्षातील गुणवत्ताधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे होत.

**प्रथम वर्ष कला -**

मराठी विषयात प्रथम क्रमांक - महाजन साक्षी चंपालाल ८५%

चौधरी विद्या गणेश ८५%

**द्वितीय वर्ष कला - मराठी विशेष स्तर**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक - | महाजन कांचन संजय -७६.५८% | |
| द्वितीय क्रमांक - | चौधरी मुक्ता प्रकाश | ७५.६३% |
| तृतीय क्रमांक - | कोळी पुनम वसंत | ७४% |

**तृतीय वर्ष कला - मराठी विशेष स्तर**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक - | बारी निकिता बाळू | ७८.८३% |
| द्वितीय क्रमांक - | चौधरी रूपाली पांडुरंग | ७७.३३% |
| तृतीय क्रमांक - | बाविस्कर योगिता शालिक | ७६.६३% |

**पद्व्युत्तर स्तर - मराठी ( एम. ए. )**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक - | चौधरी निकिता प्रभाकर | ८१.२५% |
| द्वितीय क्रमांक - | महाजन भारती शिवाजी | ७६.३१% |
| तृतीय क्रमांक – | तायडे विद्यारत्न सुधाकर | ६९.९४% |

सर्व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

प्रा. डॉ. रेखा प्रमोद पाटील
( मराठी विभाग प्रमुख )

# प्राध्यापक प्रबोधिनी मंडळ

**“संशोधकांचा सत्कार समारंभ ”**

महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी मंडळात फेंपी. एच.डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार 22/06/2021 रोजी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ.जे.बी.अंजने उपस्थित होते. सत्कारार्थी प्राध्यापकांमध्ये वनस्पतीशास्त्र विषयाचे डॉ.एस.बी.पाटील (Studies on fresh water algal flora in Anjani dam of Jalgaon district Maharashtra),इंग्रजी विषयाचे डॉ.एन.यु.बारी (Rethinking of Myths in the novels of Arun Joshi) व ग्रंथालयाचे डॉ.एस.एस.साळुंके (Cloud based information services in IIM Libraries) यांचासत्कार शाल वगुलाबपुष्प देऊन करण्यात आला. सत्कारार्थी प्राध्यापकांनी आपल्या मनोगतात आपले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या मनोगतात प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रोत्साहीत केले. कार्यक्रमा चे सूत्रसंचालन समितीचे चेअरमन प्रा.एस.बी.महाजन यांनी तर आभार समिती सदस्य प्रा.एस.आर.इंगळे यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापकव शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

चेअरमन
प्रा. एस. बी. महाजन

## AISHE (All India Survey on Higher Education)

महाविद्यालयाची चालू शेक्षणिक वर्षाची सर्व विभागांची माहिती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी , मागील शैक्षणिक वर्षाचा निकाल, शिष्यवृत्ती इत्यादी माहिती दरवर्षी महाविद्यालयाचे प्राचर्य डॉ. जे. बी. अंजने व वरीष्ठलिपीक श्री. पी. व्ही. महाजन यांच्या मदतीने महाविद्यालयाचे नोडलऑफीसर प्रा. एस. बी. महाजन भारतसरकारच्या मानवसंसाधन विकास मंत्रालयाकडे पाठवितात. भारतातील विद्यापिठे, महाविद्यालये यांची माहिती राज्यनिहाय गोळा केली जाते. यासाठी दरवर्षी कार्यशाळांचे आयोजन होते. कार्यशाळेत मिळालेल्या महितीच्या आधारे अहवालतयार केला जातो.

प्रा. एस. बी. महाजन
नोडल ऑफीसर

# गणित विभाग

महाविद्यालयात गणित विषय हा द्वितीय वर्ष विज्ञान वर्गापर्यंत शिकविला जातो. या वर्षी विभागामार्फत १२मे २०२० या तारखेपासून online गणितीय चाचणी परीक्षा घेण्यात आली. तसेचभारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अयंगर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने २२ डिसेंबर २०२० रोजी राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी गणितीय ऑनलाईन परीक्षेचेआयोजन महाविद्यालयाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्यासर्व विद्यार्थांसाठी करण्यातआले.तसेच स. व. प. जुनिअर कोलेजच्या ११ वी व १२ वी च्या सर्व विद्यार्थांसाठी आयोजित केली. परीक्षेसाठी ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

परीक्षेत प्राविण्य प्राप्त केलेले विद्यार्थी खालील प्रमाणे ...

प्रथम क्रमांक (80%) : 1. ऐश्वर्या संतोष पाटील 2. रितेश अशोक कोळी 3. अलताब युसुफ पटेल

द्वितीय क्रमांक (76%) : वेदांत मनोज चौधरी

तृतीय क्रमांक (64%) : 1. पूर्वज सुनील चौधरी 2. श्रद्धा श्रीकांत चौधरी

सहभागी विद्याथ्यांना प्रमाणपत्र दिले.

प्रा. एस. बी. महाजन
समन्वयक

# रसायनशास्त्र मंडळ

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे रसायनशास्त्र मंडळा ची स्थापना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांची रसायनशास्त्र या विषयात आवड निर्माण व्हावी त्यासाठी सदर मंडळातर्फे विविध तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याखानांचे, परीक्षांचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये रसायनशास्त्र मंडळाचे उद्घाटन मा. प्रा. डॉ. जी. आर. चौधरी, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद, ता. यावल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना "Spectral Identification of Organic Compounds" या विषयावर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले.

दिनांक २८/०२/२०२० रोजी विभागातील रसायनशास्त्र मंडळ आणि विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन ऑनलाइन साजरा करण्यात आला. प्रा. डॉ. एम. के. पटेल, रसायनशास्त्र विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. सदर वेबीनार मध्ये एकूण ७१ विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेचे अध्यक्ष, चेअरमन, सचिव, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, विभागातील प्राध्यापक प्रयत्नशील आहे.

डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते,
रसायनशास्त्र मंडळ समन्वयक

# रसायनशास्त्र विभाग

महाविद्यालयातील विज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांसाठी रसायनशास्त्र हा विषय विशेष स्तरावर १९९५-९६ यावर्षपासून सुरु करण्यात आला. विभागातखालील प्राध्यापक कार्यरत आहेत.

१) डॉ.सतिश नथूदास वैष्णव (विभागप्रमुख)

२) प्रा. सुनील रमेश इंगळे (सहाय्यक प्राध्यापक)

३) डॉ. दीपक भगवान पाटील (सहाय्यक प्राध्यापक)

४) डॉ. जयंत प्रल्हाद नेहेते (सहाय्यक प्राध्यापक)

५) कु. पूजा मदनलाल कुमावत

६) कु. रेणुका गातेकर

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विभागात पद्युत्तर स्तरावरील कार्बनी रसायनशास्त्र या विषयचे द्वितीय वर्ष सुरु करण्यात आले. सदर विषयास एकूण १५ विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्तानं दिनांक ०५/०६/२०२० रोजी **"Catalysis for environmental remediation CER-2020"** या विषयावर राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले.सदर वेबीनार मध्ये डॉ. मौमिता कोटल, रसायनशास्त्रविभाग, एम. एम. स्वायत्त विद्यापीठ, अंबाला, हरियाना यांनी **"Advanced Hierarchical Nanoarchitectures as efficient light photo**

**catalysts for environmental remediation"** या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. संदीपन रॉय,रसायनशास्त्रविभाग, एम. एम. स्वायत्त विद्यापीठ, अंबाला, हरियाना यांनी **"Porous organic polymer as efficient photo catalysts for environmental remediation"** या विषयावर मार्गदर्शन केले. सदर वेबीनार मध्ये एकूण ९७१ विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांनी सहभागनोंदवला.

रसायनशास्त्रविभागआणि भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १८/०६/२०२० रोजी **"Environment, Health and Covid-19 (EHC-2020)"**याविषयावर राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले.सदर वेबीनार मध्ये यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. सदर वेबीनार मध्ये एकूण १७१७ विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांनी सहभागनोंदवला.

विभागातील रसायनशास्त्र मंडळ आणि विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८/०२/२०२० रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनऑनलाइन साजरा करण्यात आला. प्रा. डॉ. एम. के. पटेल, रसायनशास्त्र विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात सर सी.व्ही रमन याच्या संशोधन कार्याविषयी माहिती सांगितली. उपलब्ध परिस्थितीचा यथायोग्य वापर केल्यास उत्तम संशोधन कार्य होऊ शकते असे मत मांडले. सदर वेबीनार मध्ये एकूण ७१ विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांनी सहभागनोंदवला.

रसायनशास्त्र विभाग आणि धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक१६/०४/२०२१ रोजी "रीसर्च मेथडोलॉजी फॉर पी.जी. स्टुडन्ट" याविषयावर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यातआले. सदर ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन दोन्ही महाविद्यालयातील सामंजस्य कराराअंतर्गत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. जे. बी. अंजनेहे तर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. पी. आर. चौधरी, धनाजीनाना महाविद्यालय, फैजपूर लाभले.प्रथमसत्रात प्रा. डॉ. सचिन डी. येवले, रसायनशास्त्र विभागप्रमुख, पी. ओ. नाहटा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ यांनी रीसर्च मेथडोलॉजीफॉर पी.जी. रीसर्च प्रोजेक्ट याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. द्वितीयसत्रात प्रा. डॉ. हरीश आर. तळेले, रसायनशास्त्र विभाग, धनाजीनाना महाविद्यालय, फैजपूर यांनी लिटरेचर सर्वे याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मिळून एकूण१४७ जणांनी सहभाग नोंदवला.

विभागातील सर्व प्राध्यापकांनी विविध ऑन लाईन वेबीनार, चर्चासत्र, कार्यशाळा उजळणी वर्ग यामध्ये आपला सहभाग नोंदवला. तसेच ०४ शोधनिबन विविध जर्नलमध्ये प्रकाशित केले.

शैक्षणिक वर्ष२०१९-२० मधील विभागाचा निकाल खालीलप्रमाणे आहे.

**तृतीय वर्ष विज्ञान**

1) महाजन श्वेता पांडुरंग(९१.१७) - प्रथम क्रमांक
2) काळदाते आशुतोष प्रभाकर (८८.५०) - दिव्तीय क्रमांक
3) बरी केतन डीगंबर (८७.९२)- तृतीय क्रमांक

ज्या विद्यार्थ्यांनी विशेष क्रमांक प्राप्त केले अशासर्वविद्यार्थ्याना महाविद्यालायातेर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी साठीसंस्थेचे संचालक मंडळ, प्राचार्य, विभागातील प्राध्यापक प्रयत्नशील आहे.

डॉ.सतीश नथूदास वैष्णव
(रसायनशास्त्र विभागप्रमुख)

## “रीसर्च मेथडोलॉजी फॉर पी.जी. स्टुडन्ट”
## एकदिवशीय कार्यशाळा

महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग आणि धनाजीनाना महाविद्यालय, फैजपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६/०४/२०२१ रोजी “रीसर्च मेथडोलॉजी फॉर पी. जी. स्टुडन्ट” या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेचे आयोजन दोन्ही महाविद्यालयातील सामंजस्य करारांतर्गत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे तर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. पी. आर. चौधरी, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर लाभले. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत डॉ. जे. बी. अंजने यांनी सदर कार्यशाळेत एम. एस.सी.च्या विद्यार्थ्यांची संशोधनाशी ओळख होईल. तसेच संशोधनाविषयी त्यांच्या मनातील विविध शंकांचे निरसन होईल. त्यांनी संशोधन हे प्रबंधात बंदिस्त न रहता समाजाच्या विकासासाठी वापरले जाणारे असावे असे मत मांडले. दोन्ही महाविद्यालयातील सामंजस्य करारांर्गत भविष्यात ही विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल असे सांगितले.

प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय डॉ. सतीश वैष्णव यांनी करून दिला. प्रथम सत्रात प्रा. डॉ. सचिन डी. येवले, रसायनशास्त्र विभाग प्रमुख, पी. ओ. नाहटा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

भुसावळ यांनी रीसर्च मेथडोलॉजी फॉर पी.जी. रीसर्च प्रोजेक्ट या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना संशोधनाच्या विषयाची निवड कशी करावी, संशोधनांती मिळालेले रिझल्ट प्रबंधामध्ये कशापद्धतिने सादर करायचे हे सांगितले.

द्वितीय सत्रात प्रा. डॉ. हरीश आर. तळेले, रसायनशास्त्र विभाग, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर यांनी लिटरेचर सर्वे याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात संशोधन कार्य सुरु करण्यापूर्वी लिटरेचर सर्वे करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा वापर करावा हे विस्तृतपणे सांगितले. तसेच लिटरेचर सर्वे करण्यासाठी उपलब्ध स्त्रोतां विषयी माहिती दिली. सदर कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मिळून एकूण १४७ जणांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयंत नेहेते तर आभारप्रदर्शन डॉ. सतीश वैष्णव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्विते साठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने आणि प्राचार्य डॉ. पी. आर. चौधरी, धनाजीनाना महाविद्यालय, फैजपूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सुनील इंगळे, डॉ. दिपक पाटील तसेच धनाजीनाना महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. अनिल सरोदे आणि विभागातील सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले.

डॉ. सतीश एन. वैष्णव

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांन मधे स्पर्धा परीक्षांन बद्दल आवड निर्माण व्हावी आणि विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले. सदर केंद्रातर्फे विविध विषयातील तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याखानांचे आयोजन करण्यात येते.

महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व मोशन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पदवी नंतर पुढे काय? या विषया वर दिनांक ३१/०१/२०२१ रोजी वेबिनारचे

आयोजन करण्यात आले, सदर वेबिनारचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. शैलजा पाटील, संचालिका, मोशन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, जळगाव यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना पदवीनंतर उपलब्ध असलेल्या विविध कोर्सेसची माहिती दिली. विद्यार्थ्यांशी हितगूज करतांना त्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदवला.

स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी साठी महाविद्यालय आणि गुरुकुल ऑनलाईन अकॅडमी, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन २३/०८/२०२० रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदवला. प्रमुख मार्गदर्शक प्रा. लक्ष्मण चौधरी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी वेळेचे नियोजन कसे करावे तसेच पूर्वपरीक्षेची तयारी करत असताना कोणकोणते विषय अभ्यासावे याबद्दल विस्तृत चर्चा केली. प्रा. लक्ष्मण चौधरी यांनी शासनाच्या विविध भरती प्रकियाबद्दल माहिती दिली.

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई, तसेच महाराष्ट्रातील इतर प्रशासकीय सेवा पूर्ण प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आले होते. सदर परीक्षेत महाविद्यालयातील ०७ विद्यार्थ्यांनी दिनांक २०/०३/२०२१ सामायिक प्रवेश परीक्षेत सहभाग नोंदवला.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबद्दल जागृती निर्माण व्हावी त्यात ते यशस्वी व्हावेत यासाठी ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, मा. चेअरमन मा. सचिव, सर्व मा. संचालक मंडळ, महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तसेच प्राध्यापक वृंद प्रयत्नशील आहे.

डॉ. सतिश एन. वैष्णव

समन्वयक

# क्रीडा विभाग (जिमखाना विभाग )

सन २०२०-२१ या शेक्षणिक वर्षात कोविड १९ या कारणामुळे महाराष्ट्र शासनाने कोणत्याही विविध स्पर्धा प्रकार तसेच हेल्थ सेंटर सुरु ठेवू नये असे परीप्रत्रक कबचौ उमवि जळगाव यांनी सलगनित महाविद्यालयात प्राचार्यांना पत्रपाठविले होते त्या अनुषंगाने २०-२१ या काळात कोणत्याही झाल्या नाही

परंतु Online webinar घेण्यास परवानगी दिली होती त्यानुसार विद्यार्थी खेलाळूवर विविध खेळांचे बेसिक व विडीओ गेम्स देण्यात आले होते त्याचप्रमाणे महाविद्यालयात Online webinar घेतले गेले तसेच कबचौ उमवि जळगाव विद्यापीठाने महाविद्यालयातील क्रीडा संचालकांना टी वाय बी एस्सी रसायनशास्त्र व टी वाय बी एस्सी संगणक शास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांना योगा विषयाचा अभ्यास देवून त्यांना योगा विषयी बेसिक ज्ञान देवून त्यांच्याकडून विविध प्रकारचे आसन करून घेतले त्याप्रमाणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सेम ६ प्रमाणे त्यांना योगा विषयाचे रोज तासिका घेवून त्यांना योगा हा विषय शिकविण्यात आला व विद्यार्थ्यांना १०० मार्काचा बहुपर्यायी प्रश्नप्रत्रिका काढून Online परीक्षा घेवून त्यांचे मार्क विद्यापीठात पाठविण्यात आले.

प्रा. डॉ. एस. एन. झोपे
संचालक, शारीरिक शिक्षण व खेळ

# विद्यार्थी विकास विभाग अहवाल

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता.रावेर, जि.जळगाव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली या महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. शैक्षणिक वर्ष (२०२०-२१) कोरोना महामारी (कोविड-१९) मुळे हे संपूर्ण शैक्षणिक वर्ष ऑनलाईन पद्धतीने अध्ययन-अध्यापनाचे कार्य चालत होते.

महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्याशैक्षणिक विकासाबरोबरच सामाजिक,सांस्कृतिक,भावनिक विकास आणि राष्ट्रासाठी सुदृढ व सर्वगुण संपन्न युवा पिढी निर्माण करणे हा उद्देश आहे. त्यासाठी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे मा. प्र. संचालक प्रा.डॉ. पंकजकुमार नन्नवरे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. या शैक्षणिक वर्षात विविध कार्यक्रम थोर महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथी साजरे करण्यात आले. तसेच केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्या आदेशान्वये कार्यक्रम घेण्यात आले. महाविद्यालयात विविध योजना व कार्यक्रमाचे नियोजन मा. प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास मंडळाकडून अंमलबजावणी करण्याचा पुरेपूर प्रयत्न झालेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वपूर्ण होता. अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवा म्हणून वेळोवेळी सूचना-मार्गदर्शनाचे कार्य करण्यात आले. त्यातील महत्वपूर्ण कार्यक्रमांचे अहवाल पुढीलप्रमाणे –

- **मानवाधिकार दिवस-** महाविद्यालयात जागतीक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने सर होते, प्रमुख वक्ते श्री व्ही.एस.नाईक महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. एस. डी. धापसे होते. त्यांनी जागतीक मानवी हक्क दिवस या विषयावरील व्याख्यानात असे म्हटले की, जगातील सर्व माणसे जन्मतःच स्वतंत्र आणि समान असून मानवाला काही हक्क निसर्गतः जन्मजात मिळतात. म्हणूनच मानवाचे हे अधिकार स्थळ, काळ, परिस्थिती निरपेक्ष असतात. तसेच त्यांनी पुढे म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती ही समाजाची घटक असल्याने त्यास अधिकार प्राप्त झाले आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या हक्काची जोपासणूक करतांना इतरांच्या हक्कावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सरांनी असे म्हटले की, १० डिसेंबर १९४८ रोजी सयुंक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी हक्काचे जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आले होते. म्हणूनच आज संपूर्ण जगात मानवाधिकार दिवस साजरा करण्यात येतो.

विद्यार्थी विकास अधिकारी व कार्यक्रमाचे आयोजक प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी युनोतील मानवी हक्काचा जाहीरनामा यातील काही कलमांचा वाचन करून दाखवले आहे. या कार्यक्रमात ११० जणांनी सहभाग घेतले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.एस.एस.साळुंके तर आभार प्रा. व्ही.एन.रामटेके यांनी मानले.

- **मतदान व मतदार नोंदणी जनजागृती अभियान-**

महाविद्यालयात मतदान व मतदार नोंदणी जनजागृती अभियान कार्यक्रम राबविण्यात आले.त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा (५२ सहभागी), प्रश्न मंजुषा कार्यक्रम (९५ सहभागी) सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने सर होते, तर प्रमुख वक्ते महाविद्यालयातील पदार्थ विज्ञान विभागाचे प्रा.एच.एम. बाविस्कर सर होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी असे म्हणाले की, जगातील सर्वात मोठी लोकशाही देश म्हणून भारताकडे पहिले जाते. आपल्या देशाला व संसदीय लोकशाहीला बळकटी प्राप्त होण्यासाठी आपण सर्वांनी मतदान केले पाहिजे आणि महाविद्यालयातील विद्यार्थी ज्यांचे ०१/०१/२०२१ रोजी १८ वर्ष पूर्ण झाले त्यांनी मतदार यादी मध्ये नाव नोंदणी करून घ्यावे. असे आव्हान वक्त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सरांनी असे म्हटले की, लोकशाही मध्ये मतदाराला राजा म्हटले जाते कारण जनता ठरवत असते की, पुढील पाच वर्षासाठी कोणाचे सरकार निवडावयाचे म्हणून लोकांची सत्ता लोकशाहीत असते. आपण मतदान करतांना कोणत्याही अमिषाला बळी पडू नये, सक्षम नागरीकाशिवाय सुदृढ लोकशाही निर्माण होत नाही. सदसदविवेकबुद्धी जागृत ठेवून मतदान करावे

असे आव्हान विद्यार्थ्यांना केले तसेच नव मतदार होण्यासाठीची सुवर्ण संधी आपल्या महाविद्यालयातून येत आहे त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी जरूर घ्यावा असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी केले आणि मतदान करण्यासाठीची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांकिडून म्हणवून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.एच.एम.बाविस्कर, प्रा. व्ही.एच.पाटील, प्रा. एस.एस.साळुंके व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले तर आभार प्रा. डॉ. एन. एस. वाणी यांनी मानले. या कार्यक्रमात ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतले.

- **वसुंधरा दिवस –**

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला. वसुंधरा दिनानिमित्त पर्यावरण संतुलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागातर्फे करण्यात आले, यामध्ये ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवले. १ जानेवारीला झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने सर होते.

जागतीक वसुंधरा दिवस याचे औचित्य साधून महाविद्यालयातील  विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सामुहिक हरित शपथ दिली. प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी आपला परिसर, घर, गाव आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता  राखणे ही आपली प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. तसेच प्लास्टिकच्या वस्तू, कॅरीबॅगचा वापर टाळावा. पर्यावरण संवर्धनासाठी तसेच प्रत्येकाने दर वर्षी एक तरी झाड लावावे. त्याचे प्रामाणिकपणे संवर्धन करावे, उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा असे विचार व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप साळुंके यांनी केले तर आभार प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

- **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती-**

महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती ऑनलाईन पध्दतीने साजरी करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य, डॉ. जे. बी. अंजने सर होते. तर प्रमुख वक्ते म्हणून श्री व्ही. एस. नाईक महाविद्यालय, रावेर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी. आर. ढेमरे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात म.फुले दाम्पत्याच्या कार्याचा आढावा घेतला. तत्कालीन सामाजिक व्यवस्थेत स्त्रियांना शिक्षण बंदी, बालविवाह पध्दत, सतीप्रथा, बुरखा पध्दत असे अनेक सामाजिक कुप्रथा असताना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजातील स्त्री शिक्षणाची जबाबदारी घेवून क्रांती घडवून आणली. म्हणून आज आपण महिला शिक्षिका दिवस साजरा करतो, असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य,डॉ. जे. बी. अंजने यांनी महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या जीवनचरीत्रावरील आदर्शवाद विद्यार्थ्यांपुढे मांडला. भारतातील पहिली प्रशिक्षित महिला शिक्षिका सन्मान सावित्रीमाई फुले यांना मिळाला असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संदीप साळुंके यांनी केले तर आभार प्रा.एस.पी. उमरीवाड यांनी मानले. या कार्यक्रमात महाराष्ट्रासह राज्याबाहेरील एकूण १६९ जणांनी सहभाग घेतला.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-**

महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि समान संधी केंद्रामार्फत आयोजित भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३० वी जयंती साजरी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सर होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील हिन्दी विभागाचे प्राध्यापक डॉ. ईश्वर पी. ठाकूर होते. त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आजचा युवक' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना असे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाहीवर नितांत श्रद्धा होती. लोकशाही हे जीवनमूल्य व्हावे असे त्यांनी म्हटले. आज आपणास सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक संधी मिळाली, ते डॉ. आंबेडकर यांच्यामुळे त्यांनी ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली करून दिले.

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सरांनी सभेला मार्गदर्शन करतांना असे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांचा ज्ञानाचा व्यासंग अत्यंत प्रगल्भ होता. त्यांनी धर्मकारण, समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणावरील लिखाण आपल्या देशाला नेहेमीच दिशा दर्शक ठरतील. विवाह-घटस्फोट, कामगार कायदे, समान काम-समान वेतन, प्रसूती रजा, कामाचे आठ तास, स्त्रियांना संपत्तीत समान वाटा, महिला कामगार संरक्षण कायदा, आरोग्य विमा, जल-विद्युत नियोजन, नदी-जोड प्रकल्प, रिझर्व बँकेची स्थापना, मतदान अधिकार, धर्म परिवर्तन इत्यादी अनेक अशा कार्यात सर्वांना समान संधी मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली म्हणून आज आपण सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेऊ शकत आहोत. भारत आणि भारताची एकता आणि एकात्मता यामध्ये अखंड बांधिलकी स्वीकारली ते त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन तयार केलेली जगातील सर्वात मोठी राज्यघटना यामुळेच. असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तर आभार प्रा. डॉ. नीता एस. वाणी यांनी मानले. सदरील कार्यक्रमात महाविद्यालयातील ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. संदीप साळुंके, प्रा. डॉ. जे.पी. नेहेते, प्रा. डॉ. एस. एन. वैष्णव, प्रा. व्ही.एन. रामटेके व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

- **शिवस्वराज्य दिन सोहळा-** महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे शिवस्वराज्य दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सर होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रावेर येथील श्री व्ही. एस. नाईक महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी. आर. ढेमरे सर हे होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा. एस. बी. महाजन व प्रा. व्ही. एच. पाटील आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. व्ही. एच. पाटील यांनी केले.आपल्या प्रास्ताविकात शिवस्वराज्य दिन सोहळा साजरा करण्यापाठीमागील शासनाचा उद्देश आणि महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली आहे. यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. जी. आर. ढेमरे यांनी आपले विचार मांडले, त्यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हणाले की, लोकशाही शासन संस्थेत राजेशाहीचे गुणगान गाण्याचे अमोघ संगम म्हणजे शिवराज्याभिषेक सोहळा होय, जगातील पहिला राजा ज्यांचा जन्म किल्ल्यावर व शेवट ही किल्ल्यावर झाला. त्यांनी छत्रपती पद स्वंयसिद्धपणे स्थापन केले व रयतेने सर्वमान्य केलेला राजा होय, छ. शिवाजी महाराज यांचे पिता श्री शहाजीराजे भोसले यांनी केवळ दोन हजार मावळयांचे सैन्य दिले होते. छ. शिवाजी महाराजांनी त्या बळावर वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला जिंकला त्यानंतर आपल्या कौशल्याने एक लाखापेक्षा अधिक निष्ठावंत मावळे शिवरायांनी आपल्या सैन्यात सामील करून घेतले, आपल्या सैन्यात आणि अष्टप्रधान मंडळात अठरापगढ जाती-धर्माचे लोक होते, आदिलशाही सल्तनतच्या विरोधात सैन्य, आरमार उभे करतांना त्यांनी आपल्यातील फितुरांना ओळखून त्यांना हटवले, हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना, शिवराई, शिव शककर्ते, मराठी भाषा आणि रयतेच्या कल्याणासाठी स्वतःला वाहून घेतले, शत्रूच्या मनात धडकी भरवली होती त्यासाठी त्यांची युद्धनीती, गनिमी कावा, घोडदळ, हत्तीदळ, किल्ल्यांचे महत्व, सैन्य-सेनापती, कठोर परिश्रम, जिद्द, आत्मविश्वास, जननी व जन्मभूमी याविषयी जाज्वल्य अभिमान बाळगणारा राजा शिवछत्रपती हे होते. हिंदवी स्वराज्याची स्थापना ६ जून १६७४ रोजी केले. असे विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सरांनी सभेला मार्गदर्शन करतांना असे म्हणाले की, छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी राज्याभिषेक रयतेच्या सुख- कल्याणासाठी, रयतेच्या विचारला सार्वभौमत्व मिळवण्यासाठी, राज्याला अधिकृतपणा प्राप्त व्हावा यासाठी राज्याभिषेक करवून घेतले, त्यांचा राज्याभिषेक सोहळा नऊ दिवस विधीवत धार्मिक पद्धतीने चालले. राज्याभिषेकाच्या तयारीसाठी चार महिने अगोदरपासून एक लाखापेक्षा जास्त लोक रायगडावर मुक्कामी थांबले होते, दूर देशावरून आलेल्या लोकांच्या अतिथ्यासाठी रोज मिष्टान्न भोजन दिले जात होते, हिंदुस्थानातील नामवंत अकरा हजार ब्राम्हण,

भारतातील वेगवेगळ्या नद्यांचे पवित्र जल आणले होते, महाराजांचे सप्त धातू, सप्त धान्य, सप्त पदार्थ-वस्तू इ. त्यांची महातुला करण्यात आली. महादान झाल्यावर अठरा हजार सोन्याचे होन दान करण्यात आले. असा दानशूर, चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष आणि आपल्या सैन्यावर, मातृभाषेवर व मातृभूमीवर निस्सीम प्रेम करणारा राजा छ. शिवाजीराजे होते. समारोपात गड आला पण सिंह गेला, आग्र्याहून सुटका, आग्रा दिल्ली ते महाराष्ट्र रायगड असा प्रवास घोड्यावरून १२ तासात केला. शाहिस्तेखानाचे बोटे छाटणी, अफजलखानाच्या वधाच्या वेळी वापरलेली वाघनखे, चिलखत इ. वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी गुणवैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सदरील कार्यक्रमात १०० पेक्षा जास्त विद्यार्थी व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि नागरिकांचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी केले तर प्रा. डॉ. संदीप साळुंके यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमाला शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

- **सात दिवशीय ऑनलाईन योग प्रशिक्षण-** सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथील विद्यार्थी विकास व क्रीडा विभागातर्फे दि. २१ जून २०२१ ते २७ जून २०२१ या कालावधीत योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर या शिबिरात योग प्रशिक्षक सौ. चित्रा दिलीप महाजन, आनंद फौंडेशन संचलित विश्वमंगल योग व निसर्गोपचार केंद्र, जळगाव यांनी योग प्रशिक्षण घेतले. या योग प्रशिक्षण शिबिराचे समन्वयक डॉ. सचिन झोपे हे होते. योग प्रशिक्षण शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे उपस्थित होते. सौ. चित्रा महाजन यांनी योग हे ठराविक काळासाठी न करता ते दीर्घकाळासाठी किंवा रोज केले पाहिजे त्याच्यामुळे आपले शरीर निरोगी राहते तसेच आपल्या चेहऱ्यावर नेहमी उत्साह असतो. आपली प्रतिकार शक्ती वाढते व शांतपणे झोपही लागते असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी अध्यक्षीय भाषणात योगाचे महत्व सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. जे. पी. नेहेते यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. पी. आर. महाजन यांनी केले. कार्यक्रमाची तांत्रिक बाजू डॉ. एस. एस. साळुंकेव प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी पहिली. सदर शिबिराला १०९ प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी व समाजातील इतर मान्यवरांनी नोंदणी केलेली आहे. कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रा. एस. पी. उमरीवाड<br>
विद्यार्थी विकास अधिकारी

# समान संधी केंद्र

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता.रावेर, जि.जळगाव समान संधी केंद्रामार्फत विविध कार्यक्रम राबविण्यात आले. शैक्षणिक वर्ष- २०२०-२१ मध्ये कोरोना महामारी (कोविड-१९) मुळे हे संपूर्ण शैक्षणिक वर्ष ऑनलाईन पद्धतीने अध्ययन-अध्यापनाचे कार्य चालत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली समान संधी केंद्रामार्फत वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

समान संधी केंद्रामार्फत आयोजित भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३० वी जयंती साजरी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सर होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील हिन्दी विभागाचे प्राध्यापक डॉ. ईश्वर पी. ठाकूर सर होते. त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आजचा युवक' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना असे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाहीवर नितांत श्रद्धा होती. लोकशाही हे जीवनमूल्य व्हावे असे त्यांनी म्हटले. आज आपणास सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक संधी मिळाली, ते डॉ. आंबेडकर यांच्यामुळे त्यांनी ज्ञानाची दारे सर्वांसाठी समान खुली करून दिले.

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सरांनी सभेला मार्गदर्शन करतांना असे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांचा ज्ञानाचा व्यासंग अत्यंत प्रगल्भ होता. त्यांनी धर्मकारण, समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणावरील लिखाण केले, त्यांचे विचार आपल्या देशाला नेहेमीच दिशा दर्शक ठरतील. विवाह-घटस्फोट, कामगार कायदे, समान काम- समान वेतन, प्रसूती रजा, कामाचे आठ तास, स्त्रियांना संपत्तीत समान वाटा, महिला कामगार संरक्षण कायदा, आरोग्य विमा, जल-विद्युत नियोजन, नदी-जोड प्रकल्प, रिझर्व बँकेची स्थापना, मतदान अधिकार, धर्म परिवर्तन इत्यादी अनेक अशा कार्यात सर्वांना समान संधी मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली म्हणून आज आपण सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेऊ शकत आहोत. भारत आणि भारताची एकता आणि एकात्मता यामध्ये अखंड बांधिलकी स्वीकारली ते त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन तयार केलेली जगातील सर्वात मोठी राज्यघटना यामुळेच. असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजक समान संधी केंद्राचे समन्वयक प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तर आभार प्रा. डॉ. नीता एस. वाणी यांनी मानले. सदरील कार्यक्रमात महाविद्यालयातील ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. संदीप साळुंके, प्रा. डॉ. जे.पी. नेहेते, प्रा. डॉ. एस. एन. वैष्णव, प्रा. व्ही.एन. रामटेके व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रा. एस. पी. उमरीवाड, समन्वयक,समान संधी केंद्र

# परीक्षा समिती अहवाल

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या अभ्यासक्रमानुसार प्रथम व द्वितीय सत्रामध्ये सर्व वर्गांच्या विद्यापीठाच्या नियमानुसार २०२०-२१ या शेक्षणिक वर्षात दोन अंतर्गत परीक्षांचे आयोजन करण्यात आले महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनाला विशेष महत्व दिले जाते २०२०-२१ या शेक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्यात कोविड १९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी लावण्यात आली त्यामुळे या वर्षातील सर्व अंतर्गत परीक्षा विद्यार्थी वर्गात न येता ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्मवर घेण्यात आल्या.प्रथम सत्रामध्ये प्रथम अंतर्गत परीक्षा १९ ते २२ नोव्हेबर २०२० आणि द्वितीय अंतर्गत परीक्षा  २५ ते २७ नोव्हेबर २०२० या कालावधीत आयोजन करण्यात आल्या होत्या.

द्वितीय सत्रामध्ये ३ ते ५ मे २०२१ पहिली अंतर्गत परीक्षा तसेच दुसरी अंतर्गत परीक्षा १७ ते १९ मे २०२१  या दरम्यान आयोजित करण्यात आली होती महाविद्यालयातील परीक्षा समितीचे सदस्य डॉ आर व्ही भोले डॉ.एस ए पाटील श्री एस के चौधरी यांनी प्राचार्य जे.बी.अजने यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सूरळीत पार पडण्यासाठी परिश्रम घेतले

प्रा एस आर इंगळे, समन्वयक

# पारितोषिक वितरण समिती

ऐनपुर परिसर शिक्षण प्रसारक मंडल संचलित,सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय,ऐनपुर ग्रामीण भागातील एक आदर्श महाविद्यालय असुन या महविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी प्रत्येक वर्षी बक्षिस वितरण समारंभाचे आयोजन केले जाते.ज्या शिक्षणप्रेमी व दानशुर व्यक्तींनी बक्षिसासाठी महाविद्यालयास देणगी दिलेली आहे अशी सर्व एकत्रित रक्कम सेन्ट्रल बँक आफ इंडिया,शाखा निंभोरा येथे ठेवीच्या रुपात ठेऊन त्या रकमेवर येणारे व्याज प्रत्येक वर्गात विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना विभागून रोख बक्षीस दिले जाते.शैक्षणिक वर्षं २०२०-२१ मध्ये महाराष्ट्र शासनाने कोविड- १९ चा वाढता प्रसार पाहता टाळेबंदी जाहीर केली.त्यामुळे जाहीर केलल्या नियमावलीचे पालन करून कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम न घेता विद्यार्थ्यांना बक्षिसाचे वाटप करण्यात आले.महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक वर्गातील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देवून गौरवण्यात आले.सर्व कार्यक्रमांना संस्थेचे संचालक मंडळ, प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने मार्गदर्शन करत असतात.समितीचे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रा.एस.आर.इंगळे , प्रा.एस.बी.महाजन व प्रा.व्ही.एच.पाटील यांनी परीश्रम घेतले.

प्रा.एस.आर.इंगळे. चेअरमन, पारितोषिक वितरण समिती

# ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय) अहवाल

[ दिनांक ०१-०४-२०२० ते ३१-०३-२०२१ ]

## ❖ ग्रंथालय सल्लागार समिती (Library Advisory Committee) :-

महाविद्यालाच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापन हे ग्रंथालय समिती मार्फत होत असते त्यानुषंगाने ग्रंथालय सल्लागार समिती गठीत करण्यात आलेली आहे. ग्रंथालयाचा वाचकासाठी जास्तीत जास्त व प्रभावी उपयोग व्हावा यासाठी ग्रंथालय समिती विविध शिफारसी करत असते. यासमितीच्या वार्षिक कमीतकमी दोन सभा घेण्यात येतात. या समितीमध्ये एकुण ९ सभासद आहेत.

| अ.क्र | समिती सदस्याचे नाव | समिती पद |
|---|---|---|
| १ | डॉ. जसवंत बी. अंजने, प्राचार्य | अध्यक्ष |
| २ | प्रा. विनोदएन. रामटेके , सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ३ | डॉ. पीरु. आर. गवळी , सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ४ | डॉ. प्रवीण. आर. महाजन, सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ५ | डॉ. सतीश. एन. वैष्णव, सहा. प्राध्यापक | सदस्य |
| ६ | श्री. गोपाल एस. महाजन | सदस्य |
| ७ | प्रा. संदीप एस. साळुंके, ग्रंथपाल | सचिव |
| ८ | कु. अश्विनी तायडे, (T.Y.B.Sc.) | विद्यार्थी |
| ९ | श्री. शांताराम गोकुलसिंग राजपूत, (MA-II) | विद्यार्थी |

शै. वर्ष २०२०-२०२१ मध्ये ग्रंथालय समितीच्या एकूण तीन बैठका अनुक्रमे. जुलै-२०२०, डिसेंबर-२०२० आणि फेब्रुवारी-२०२०, या महिन्यात संपन्नझाल्या.

## ❖ ग्रंथालयाच्या वाचकांची नोंदणी(Registration of Library Members) :-

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये ग्रंथालयाने एकुण १५४ वाचकांची नोंदणी करून त्यांना ग्रंथालयाच्या सेवा दिलेल्या आहेत. ग्रंथालयाच्या वाचकांचे खालील प्रकारे वर्गीकरण आहे.

एकूण वाचक नोंदणी:-१५४

विद्यार्थी :-एकूण ११६

शिक्षक:-३२, शिक्षकेतर कर्मचारी:-२, ILL- ०३, ईतर:-१

## ❖ ग्रंथालयाचा वापर(Utilization of Library) :-

एकूण सक्रिय वाचकांचे दिवस : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोना संसर्ग परिस्थिती असल्यामुळे शासनाने संपूर्ण शैक्षणिक वर्षभर म्हणजेच जून २०२१ पावेतो विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष येण्यास मनाई केली होती त्यामुळे ग्रंथालय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दैनिक ग्रंथ देव घेव करण्यास असमर्थ

होती. परंतु विद्यार्थ्यांना शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच ग्रंथालय सल्लागार समितीच्या मार्फत कोरोनाकाळात पुस्तक देव घेव करण्यात आली. या शैक्षणिक वर्षात १५४ ग्रंथालयाच्या वाचकांना एकूण ७६६ ग्रंथ देण्यात आले.

## ❖ ग्रंथालयातील ज्ञानसंपदा(Library Collection) :-

**शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ ग्रंथ खरेदी(दि. ०१ एप्रिल २०२०ते दि. ३१ मार्च २०२१)**

| पुस्तके खरेदी | क्रमिक पुस्तके | | संदर्भ पुस्तके | | एकूण शिर्षके | एकूण पुस्तके | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | | | |
| महाविद्यालय निधी | 325 | 45090 | 147 | 44798 | 92 | 472 | 89888 |
| देणगी | 0 | 0 | 9 | 2780 | 8 | 09 | 2780 |
| एकूण | 325 | 45090 | 156 | 47578 | 100 | 481 | 92668 |

**एकूण ग्रंथ संपदा ( ३१ मार्च २०२० पर्यंत अद्ययावत)**

| पुस्तके खरेदी | क्रमिक पुस्तके | | संदर्भ पुस्तके | | एकूण शिर्षके दाखल | एकूण पुस्तके | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | | | |
| एकूण | 9567 | 9,52,040 | 4425 | 16,50,987 | 6516 | 13992 | 26,03,027 |

## ❖ मासिके व नियतकालिके(Periodicals)

आमच्या ग्रंथालयात खालील तक्त्यात दर्शविलेले एकूण १२ छापील नियतकालिके आहेत. याशिवाय महाविद्यालयातील डॉ. आर. व्ही. भोळे यांच्याकडून संपूर्ण वर्षभरासाठी 'Journal of Research and Development' हे आंतरराष्ट्रीय पातळीचे संशोधन मासिक देणगी म्हणुन देण्यात आलेले आहे.

**( शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठीचे )**

| अ.क्र. | नियतकालिकाचेनाव | प्रकार | विषय | पातळी | भाषा |
|---|---|---|---|---|---|
| १ | Employment News | Weekly Newspaper | Competitive Exam/Jobs | राष्ट्रीय | इंग्रजी |
| २ | योजना | Monthly Magazine | Socio -Economic Issues | राष्ट्रीय | इंग्रजी |
| ३ | लोकराज्य | Monthly Magazine | General | राज्य | मराठी |
| ४ | नोकरी संदर्भ | Weekly Newspaper | Competitive Exam | राष्ट्रीय | मराठी |
| ५ | मुराळी | Monthly Res. Journal | Interdisciplinary | राज्य | मराठी |
| ६ | अर्थसंवाद | Quarterly Research Journal | Economics | राष्ट्रीय | मराठी |
| ७ | परिवर्तनाचा वाटसरू | Fortnightly | Multidisciplinary | राज्य | मराठी |
| ८ | University News | Weekly Magazine | Higher Education | राष्ट्रीय | इंग्रजी |
| ९ | प्रिय रसिक | Monthly Magazine | General | राष्ट्रीय | मराठी |
| १० | सेवार्थ | Monthly Magazine | Higher Education | राज्य | मराठी |
| ११ | ओमशान्ति मिडिया | Monthly Magazine | Spirituals | राष्ट्रीय | मराठी |
| १२ | खोज गांधीजी की | Monthly Magazine | Gandhi Research | राष्ट्रीय | हिंदी |
| १३ | VigyanPrasar DREAM | Monthly Magazine | Science and Technology | अंतरराष्ट्रीय | इंग्रजी |

### ❖ पुस्तक पेढी सुविधा (Book Bank Facility )

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने गरजुवंत विद्यार्थ्यासाठी पुस्तक पेढी (बुक बँक ) ची सुविधा दिलेली होती. या योजनेचा एकूण **24** विद्यार्थ्यांना लाभ झाला. या योजनेंतर्गत एकूण **244** पुस्तके विद्यार्थ्यांना वर्षभर वाचनासाठी देण्यात आली. तसेच तृतीय वर्ष विज्ञान या वर्गाच्या विद्यार्थ्यांना माफक फी आकारून पुस्तक पेढी सुविधा मार्फत वर्षभरासाठी पुस्तकाचा संच दिला जातो.

### ❖ ग्रंथालय कर्मचारी

| अ.क्र | ग्रंथालय कर्मचारी | शैक्षणिक योग्यता | पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ. संदीप एस. साळुंके | MLIS,MCM,NET,SET,Ph.D | ग्रंथपाल |
| २ | श्री. महेंद्र डी. महाजन | HSC | शिपाई |

### ❖ पुस्तकांची दंड वसुली :-

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने ठरवून दिलेलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी दिलेल्या कालावधीत पुस्तके परत करायची असतात जेणे करून परत आलेली पुस्तके पुन्हा इतर विद्यार्थ्यांनी मिळतील, परंतु काही विद्यार्थी वेळेत पुस्तके परत नकरत असल्याकारणाने इतर विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यास ग्रंथालय असमर्थ ठरते. यामुळे वेळेत पुस्तक परत नकरणाऱ्या वाचकाकडून योग्य तो दंड वसूल केला जातो.

तसेच बरेच विद्यार्थी पुस्तके हाताळणी हि योग्य प्रकारे नकेल्याने पुस्तके काही दिवसातच निकामी ठरतात, तसेच काही वाचक जाणून बुजून पुस्तकामधील पाने फाडतात यामुळे पुस्तके इतरांच्या कामी येऊ शकत नाही. म्हुणुन त्या वाचकाकडून शिक्षा म्हणून दंड वसूल केला जातो.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने एकुण **५१६१/- रुपये** (पावती क्र.२०० ते २११) इतकी पुस्तकांची दंड वसुली केली आहे.

### ❖ अभ्यासिका कक्षाची व्यवस्था(Reading Room):-

ग्रंथालयात वाचकांना अभ्यासासाठी अभ्यासिका कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अभ्यासिका कक्षामध्ये ६० इतक्या क्षमतेची वाचकांसाठी बैठक व्यवस्था आहे. तसेच विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांसाठी वेगळी बैठकव्यवस्था करण्यात आलेली आहे.

### ❖ Library Orientation Programme चे आयोजन :-

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला नवीन वाचकांना ग्रंथालयाची माहिती व्हावी यासाठी Library Orientation Programmeचे आयोजन करण्यात येते. यात ग्रंथालयात उपलब्ध ज्ञान साधन संपदेची ओळख करून देवून ती आपणापर्यंत कश्या पद्धतीने प्राप्त करून घेता येईल त्याच प्रमाणे ग्रंथालयाचे सर्वसाधारण नियम याविषयी सखोल माहिती दिली जाते. यामुळे नवीन प्रवेशित वाचकांना ग्रंथालयाविषयी आपुलकी तसेच जिज्ञासा निर्माण होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे तसेच वाचनाचे महत्व पटवुन दिले जाते. तसेच ग्रंथालयातील क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, इन्टरनेट सेवा, झेरॉक्स सेवा, ग्रंथालय वेबसाईट, रोजगार विषयक मार्गदर्शन याविषयी सविस्तर माहिती सांगितली जाते.शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्येकोविद-१९ संसर्ग परिस्थिती लक्षात घेता प्रथम वर्ष कला, विज्ञान, आणि प्रथम वर्ष पद्वुत्तर प्रवेशित विद्यार्थ्यांना झूम मिटिंग द्वारे ०७-०२-२०२१ रोजी ग्रंथालय ओळख कार्यक्रम घेण्यात आला.

### ❖ संदर्भ सेवा (Reference Service)

संदर्भ विभाग हा कोणत्याही ग्रंथालयाचा कणा असतो. आमच्या ग्रंथालयात सुसज्ज असा संदर्भ विभाग आहे. यामध्ये मुख्यत्वे भारतीय राज्यघटना, New Encyclopedia Brittanica (एकुण ३२ खंड), दशांश वर्गीकरण पद्धती (२३ वी आवृत्ती), रसायनशास्त्र, गणित, विज्ञान, English Best Literature, Hinduism and Buddhism, मराठी, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, वनस्पतीशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, मानव अधिकार शिक्षण, बँकिंग अँड फायनन्स इत्यादी विषयाचे विश्वकोश आहेत. याशिवाय आदर्श मराठी शब्दकोश, Oxford Dictionary, नकाशासंग्रह, विविध समाज सुधारकांचे चरित्रे, जळगाव जिल्हा गँझेटीअर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ग्रंथसंग्रह, साने गुरुजी संग्रह, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन चरित्रावर आधारित १८५ पेक्षा जास्त ग्रंथसंग्रह अशी दुर्मिळ ग्रंथसंपदा आहे.

### ❖ राष्ट्रीय ग्रंथालय/ग्रंथपाल दिवस(Librarian Day):-

ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती भारतात ग्रंथपाल दिन म्हणून साजरी करण्यात येते. त्यानिमिताने महाविद्यालयात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या हस्ते पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्राचार्यांनी ग्रंथालयाचे विद्यार्थी जीवनातील महत्व विषद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप साळुंके यांनी केले. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्येकोविद-१९ संसर्ग परिस्थिती लक्षात घेता सदर कार्यक्रम झूम मिटिंग द्वारे१२-०८-२०२० रोजी घेण्यात आला.

## ❖ वाचन प्रेरणा दिवस आयोजन:-

महाविद्यालयात ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि मराठी या विभागातर्फे **१५ ऑक्टोबर** २०२० रोजी म्हणजेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीला वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने सर हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमासाठी लाभलेल्या वक्त्यांचा परिचय महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संदीप साळुंके यांनी करून दिला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून विवरे खु. येथील जि. प. मराठी शाळेचे पदवीधर शिक्षक श्री. दिपक सोनार, पदवीधर शिक्षक व ऐनपूर महाविद्यालयातील प्रा. एम. के. सोनावणे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वाचन करून आपला आत्मविश्वास वाढविला पाहिजे तसेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे असे श्री. दिपक सोनार यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच वाचनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, वैज्ञानिक दृष्टीकोन वाढतो असेही ते म्हणाले. प्रा. एम. के. सोनावणे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या चरित्राविषयीची माहिती दिली. तसेच वाचन म्हणजे काय, वाचन कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. वाचन करतांना आकलन होणे गरजेचे आहे व वाचनामुळे ज्ञान प्राप्त होते असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आज पासून सुरुवात करून एक तरी पुस्तक वाचावे असे त्यांनी सांगितले. तसेच वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्याचा महत्वाचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यात विचार करण्याची दृष्टी व शक्तिशाली कृती करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा आहे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. पी. नेहेते यांनी तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. बी. पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ११० प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यायातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. जे. पी. नेहेते, प्रा. एस. एस. साळुंके, प्रा. डॉ. डी. बी. पाटील व प्रा. डॉ. एस. एन. वैष्णव यांनी परिश्रम घेतले.

## ❖ Inter Library Loan Service

वाचकांसाठी ग्रंथालयात एखादे वाचन साहित्य उपलब्ध नसेल तर आंतर ग्रंथालय देव घेवयोजनेअंतर्गत श्री. व्ही.एस. नाईक महाविदयालय, रावेर, धनाजी नाना महाविदयालय, फैजपूर

आणि संतगाडगेबाबा हिंदी महाविद्यालय भुसावळ येथून ग्रंथ घेण्याची सुविधा करून देण्यात आलेली आहे. याअंतर्गत ७ ग्रंथ वाचकांना उपलब्ध करून देण्यात आले.

## ❖ ग्रंथालय संगणकीकरण (Library Automation)

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती तंत्रज्ञान हे प्रत्येक ज्ञानशाखेसाठी आवश्यक झालेले आहेत. याचाच एक भाग म्हणुन आमच्या ग्रंथालयात संगणकीकरणासाठी SOUL 2.0 या संगणक प्रणालीचा वापर करण्यात येतो. INFLIBNET, अहमदाबाद या संस्थेने २००० साली CALIBER या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये SOUL या संगणक प्रणालीचा शुभारंभ केला.२००८ मध्ये या संगणक प्रणालीची SOUL 2.0 हे आवृत्ती आली. या संगणक प्रणालीमध्ये Acquisition, Catalogue, Circulation, OPAC, SerialControl, Administration इत्यादी Modules आहेत.आमचे ग्रंथालय आंशिक प्रमाणातसंगणकीकृतआहे.

## ❖ OPAC ची सुविधा

ग्रंथालयात OPAC (Online Public Access Catalogue) ची सुविधा आहे. ग्रंथ शोधण्यासाठी त्याचा उपयोग होऊन वाचकांचा वेळ वाचतो.

## ❖ Internet Service

ग्रंथालयात वाचकांसाठी इंटरनेट सेवा देण्यात येते. त्यासाठी एकुण ८ संगणक उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

## ❖ N-List Service

INFLIBNET, अहमदाबाद यांच्यामार्फत वाचकांना N-List सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यामध्ये वाचकांना ९७,००० ई-पुस्तके आणि ६००० पेक्षा जास्त ई-मासिके ऑनलाईन बघता येतात, तसेच जतन करता येतात. महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकांचा **N-List**वर नोंदणी असून वेळोवेळी वापराबद्दल मार्गदर्शन केले जाते. महाविद्यालयातील प्रत्येक पद्वुत्तर विद्यार्थ्यांना N-List वर नोंदणी करणे बंधनकारक असून त्यांची नोंदणी करून त्यांना N-List वापराचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## ❖ Print/Reprography Service (Zerox ) :-

महाविद्यालयातील सर्व वाचकांना, तसेच बाह्यगत वाचकांसाठी ना नफा-ना तोटा या तत्वानुसार दोन रुपयेयादराने Print/Reprography सेवा देण्यात येते. याअंतर्गत एकूण ७६७४ प्रति झेरोक्स

सुविधा देण्यात आली. या एकूण झेरोक्स पैकी महाविद्यालयाच्या ७०२५ विद्यार्थाय्च्या ६४९, प्रति झेरोक्स सुविधेचा लाभ देण्यात आला.

### ❖ New Arrivals ची सुविधा :-

ग्रंथालयात प्रत्येक महिन्याला ग्रंथ खरेदी करण्यात येते. या सर्व ग्रंथांची यादी सूचना फलकावर लावण्यात येते. तसेच नवीन आलेल्या ग्रंथांना फेसबुक, ब्लॉग आणि ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात येते. यामुळे वाचकांना ग्रंथालयात आलेल्या नवीन ग्रंथांची माहिती होते.

### ❖ उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार :-

ग्रंथालायामार्फत दरवर्षी 'उत्कृष्ट ग्रंथालय वाचक पुरस्कार' दिला जातो. यामध्ये वाचकाची ग्रंथालयातील हजेरी, वर्तणुक, इंटरनेट, ग्रंथ, मासिके यांचा वापर या निकषावरून ग्रंथालय सल्लागार समिती या पुरस्काराची निवड करते. शैक्षणिक वर्ष **२०२०-२१** चा हा पुरस्कार **कु. चौधरी विद्या गणेश** या **द्वितीय वर्ष कला** वर्गाच्या विद्यार्थिनीला देण्यात आला.

### ❖ स्पर्धा परीक्षा कट्टा (Competitive Exam Guidance )

ग्रंथालयात नोकरीविषयक जाहिरातीसाठी स्वतंत्र्य सूचनाफलक आहे. यासुचनाफलकावर रोजगार, नोकरीविषयक जाहिरातींचे कात्रणे लावण्यात येतात. याचा वाचकांना रोजगार, नोकरीविषयक संधी शोधण्यासाठी फायदा होतो. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाबद्दल वेळेवेळी माहिती उपलब्ध व्हावी व त्यांना भविष्यात स्पर्धा परीक्षेबद्दल गोडी निर्माण व्हावि ह्या उद्देशाने ग्रंथालयाने 'स्पर्धा परीक्षा कट्टा' हा उपक्रम सुरु केला यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रंथालयातर्फेनोकरीविषयक जाहिराती व उपयुक्त माहिती विद्यार्थ्यापर्यंत पोहचविण्यासाठी उपलब्ध माहिती तंत्रज्ञान साधन म्हणून WhatsApp या SocialMedia तंत्राचा वापर करून विविध Groups (SVPCA-Girls, SVPCA-Boys, SVPCA E-Classes, SVP College, Alumni of svp college) वर वेळोवेळी माहितीपाठविण्यात येते.

### ❖ External Membership ची सुविधा

महाविद्यालयीन वाचकांप्रमाणेच इतर वाचकांना ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी External Membership ची सुविधा आहे. या वाचकांकडून२०० रुपये नाममात्र शुल्क आकारून त्यांचीनोंदणी केली जाते. या वाचकांना ग्रंथालय नियमांनुसार सर्व सेवा देण्यात येतात.

### ❖ ग्रंथ/मासिके बांधणी

ग्रंथालयात दरवर्षी जीर्ण, फाटलेल्या ग्रंथाची तसेच मासिके/नियतकालिके यांची बांधणी केली जाते. व ते वाचकांना अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले जातात.

### ❖ Newspaper Clipping Service

रोजगार विषयक जाहिरीती, महाविद्यालायात होणाऱ्या विविध घडामोडी विषयी वर्तमानपत्रामध्ये आलेली माहिती जतन करण्यात येते.

### ❖ प्राथमिक उपचार सुविधा (First Aid Facility)

ग्रंथालयामध्ये किरकोळ दुखापत दुरुस्तीसाठी प्राथमिक उपचार सुविधा देण्यात येते.

### ❖ जुन्या प्रश्नपत्रिका पुरवण्याची सुविधा (Old Question Papers Facility)

ग्रंथालयात वाचकांना सर्व वर्गांच्या जुन्या प्रश्नपत्रिका पुरवण्यात येतात. याचा वाचकांना परीक्षेच्या तयारीसाठी मदत होते.

### ❖ ग्रंथालय प्रतिसाद २०२०-२१ ( Library Feedback-२०२०-२१)

ग्रंथालयाचे सभासद असलेल्या वाचकांकडून दरवर्षी Feedback घेतला जातो. त्यामधून वाचकांच्या ग्रंथालयाविषयी काही मागण्या, तक्रारी, सूचना असल्यास त्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक वर्ष **२०२०-२१**या वर्षाचा ग्रंथालय वाचक प्रतिसाद दिनांक ०६-०९-२०२१ ते ०८-०९-२०२१ या दरम्यान घेण्यात आला. प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण करून त्यानुसार ग्रंथालय समितीच्या आगामी बैठकीत योग्य त्या पुढील कार्यवाही साठी ठेवण्यात येईल.

**डॉ. एस. एस. साळुंके.**
संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र

# प्रकाशन विभाग

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या संकल्पनेतून महावियालयात प्रकाशन विभाग कार्यान्वित करण्यात आला. या विभागाचा मुख्य हेतू हा संशोधकांना संशोधनपर लेखन तसेच वाचन साहित्य निर्मितीत प्रोत्साहन देणे हा असून. संशोधकांच्या साहित्याची प्रकाशनाच्या दृष्टीकोनातून सर्व जवाबदारी हि हा विभाग घेतो. यासाठी शासनाकडून रीतसर नोंदणी करून ISBN चा एक ५० पुस्तकांचा संच मान्य करून घेण्यात आला आहे. प्रकाशन विभागाने सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात दोन संपादकीय ई-ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

## प्रकाशन विभामार्फात प्रकाशित ई-ग्रंथ

### १) ज्ञानाचे प्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक:- **प्राचार्यडॉ. जे. बी. अंजने,**
**प्रा. व्ही. एन. रामटेके,**
**डॉ. एस. एस. साळुंके**

ISBN क्रमांक : **978-81-946921-0-2**
महाविद्यालय प्रकाशन क्र.०३
एकूणपाने:-**११५**
एकूण**१४लेख**प्रकाशित.
प्रकाशन हस्ते: **डॉ. एल. ए. पाटील**
प्रकाशन दिनांक : ०९-१०-२०२०




ऐनपूर येथिल सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात "ज्ञानाचे प्रतीक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर" या इ-ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. डॉ. एल. ए. पाटील, नॅनो संशोधक तथा माजी प्राचार्य प्रताप कॉलेज अमळनेर यांचे हस्ते ऑनलाइन करण्यात आले. या प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष व ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ ऐनपूर मंडळाचे संचालक मा.आर. एन महाजन हे होते तर सरदार वल्लभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी अंजने यांनी प्रस्ताविक केले. प्रकाशनपर भाषणातप्रा.एल. ए. पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान हे विश्वातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. हे संविधान स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारित आहे बाबासाहेबांनी ज्ञानाच्या जोरावर या देशाला भारतीय संविधान च्या रूपाने एक महान ग्रंथ सुपूर्त केला. आज या देशात सर्व नागरिकांना समान संधी स्वातंत्र्य मिळाले ते संविधानामुळे असे सांगीतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही.एन. रामटेके यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ एस. ए. पाटील यांनी करून दिला. आभार प्रदर्शन प्रा.डॉ एस.एन.वैष्णव यांनी केले. तांत्रिक बाबी

प्रा.डाॅजे.पी.नेहेते व प्रा डॉ संदिप साळुंके यांनी सांभाळली. सदर ई-ग्रन्थ“ज्ञानाचे प्रतीक -डॉ. बाबासाहेब आंबेडकर” चे संपादन प्राचार्य डॉ. जे बी. अंजने,प्रा. व्ही.एन.रामटेके व प्रा.एस.एस.साळुंके यांनी केले. या ई-ग्रंथात भारतातून विविध भागातील लेखकानी सहभाग नोंदवून एकुण १४ लेख अंतिम स्वरूपात प्रकाशित केले गेले. या कार्यक्रमास ३५६ प्राध्यापक, विद्यार्थी, व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**२) २१ व्या शतकाकडील वाटचाल व कोरोनाचे महासंकट**

संपादक:- **प्राचार्यडॉ. जे. बी. अंजने,**
**डॉ. नीता एस. वाणी**
**प्रा. व्ही. एच. पाटील,**
**डॉ. एस. एस. साळुंके**

ISBN क्रमांक : **978-81-946921-1-9**
महाविद्यालय प्रकाशन क्र.०४
एकूण पाने: **१०२**
एकूण**१९ लेख** प्रकाशित.
प्रकाशन हस्ते: **डॉ. एन. एल. चव्हाण**
प्रकाशन दिनांक: ०६-१२-२०२०




ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथील अर्थशास्त्र विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या तर्फे कोरोना महासंकटाची तीव्रता, त्याचे सर्वांगीण क्षेत्रावर होणारे परिणाम लक्षात घेऊन अभ्यासकांचे, विचारवंतांचे मते समाजा पर्यंत पोहोचविण्यासाठी ईबुक ची निर्मिती केली त्याचा प्रकाशन सोहळा झूम वर संपन्न झाला. प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले पुस्तक प्रकाशन डॉ. एन. एल. चव्हाण डी.एन.कॉलेज फैजपूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. डॉ. एन. एल. चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात कोरोनाचे भीषण परिणाम आकडेवारीसह सादर केले तरीही फिनिक्स पक्षाप्रमाणे भारत पुन्हा उंच भरारी घेईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. शोध निबंधकातून डॉ. .प्रकाश राठोड यांनी मनोगत व्यक्त केले कोरोनाचे भीषण परिणाम सांगून एक मनाला चटका लावणारी कविता त्यांनी सादर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ई-बुक च्या प्रकाशनाचा उदिष्ट कथन केले जागतिक आरोग्यने व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा भारताची स्थिती भरपूर चांगली आहे असे ते म्हणाले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नीता एस. वाणी सूत्रसंचालन डॉ. संदिप साळुंके आणि आभार प्रा. विलास पाटील यांनी मांडले.

वरील ई-ग्रंथात भारतातील विविध ठिकाणांहून लेख प्राप्त होऊन त्याची पडताळणी, भाषा शुद्धीकरण, ग्रंथ प्रकाशनाचे इतर सोपस्कार करून मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले आणि महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनाअट/मोफत उपलब्धकरून देण्यात आले आहे.

**डॉ. एस. एस. साळुंके**
**समन्वयक, प्रकाशन विभाग**

# "बौद्धिक संपदा हक्क" राष्ट्रीय सेमिनार

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथील ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय) आणि आय. क्यू. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमानाने "बौद्धिक संपदा हक्क" या विषयावरदिनांक १६ मार्च २०२१ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. के. जी. कोल्हे यांनी केले त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याची प्रासंगिकता तसेच त्याची व्याप्ती या विषयी माहिती देऊन हे सेमिनार सहभागी मान्यवरांना कश्या प्रकारे उपयोगी ठरणार आहे या विषयी सांगितले.

